मंगळवार, ५ सप्टेंबर २०२३

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३७

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●TUESDAY 5 SEPTEMBER 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-37 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5




## रक्षक घडवता की हैवान?

आधुनिक केसरी

पोलीसांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था कायद्याचे रक्षक घडवतात की हैवान तयार करतात? ज्या क्रूरपणे, जीव खाऊन पोलीस आंदोलकांना मारतात ते व्हिडीओ पाहून हाच प्रश्न पडतो. लाठीमार करताना पोलीस इतके आंधळे कसे होतात? महिला, वृद्ध, लहान मुलेही त्यांना दिसत नाहीत? जालना शहरात पूर्वी जेव्हा जेव्हा संचारबंदी लागली तेव्हा रेल्वेतून शहरात उतरलेल्या निरपराध प्रवाशांनाही एसआरपी पोलीसांनी विनाकारण मारलेले आहे. अशा वेळी कुणी नागरिक चुकून रस्त्यावर दिसला तर त्या असहाय व्यक्तीला पोलीसांनी घेरून बेदम मारहाण केलेली आहे. कुणी पोलीसांच्या भीतीने घरात पळून गेला तर त्याच्या दारावर बुटाच्या लाथा घालून, रस्त्यावर ओढून तुडवले जाते. दारे तोडून, घरात घुसून लोकांना मारण्याचा अधिकार या पोलीसांना आहे का?

(वाचा एसआरपीएफ अधिनियम 1951 पृष्ठ 11, नियम 5: ज्या कोणत्याही इसमाने राज्याविरुद्ध सशस्त्र उठाव केला आहे, असे वाटण्यास कारण नसेल अशा इसमावर अन्यायाची बळजोरी किंवा त्याच्यावर हल्ला किंवा कोणत्याही गैरकायदेशीर कारणासाठी कोणतेही घर किंवा इतर ठिकाण फोडून आत शिरेल त्या प्रत्येक राखीव पोलीस अधिका-यास, नंतर, त्यास दोषी ठरविण्यात आले असता, चौदा वर्षे मुदतीची सश्रम कैदेची आणि दंडाचीही शिक्षा होईल.)

आपल्याच लोकांविरुद्ध पराकोटीचा द्वेष, राग पोलीसांच्या मनात कोण भरवते? 1857 च्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यानंतर ब्रिटिशांनी बनवलेल्या 1861च्या कायद्याने पोलीसांना अपार अधिकार दिलेले आहेत. कायदा, सुव्यवस्थेसाठी या अधिकारांचा व बळाचा योग्य वापरही पोलीसांनी करावा.

पण त्यात द्वेष आणि क्रूरतेची भेसळ झाली तर जनतेची शक्ती बलाढ्य लष्करालाही नमवते हा जगाचा इतिहास आहे.

पोलीसी अत्याचारामुळे शांतता प्रस्थापित होते या भ्रमातून सर्वच पोलीस बलांनी जागे व्हावे.

विनोद जैतमहाल, जालना

# तर आम्ही राजकारणातून संन्यास घेऊ

## अजित पवार : सरकार मराठा आरक्षणाविषयी गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : जालना जिल्ह्यातल्या आंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आंदोलकांवर लाठीचार्जचे आदेश 'वरून' देण्यात आले, असा आरोप विरोधक वारंवार करत आहेत. विरोधकांनी हे जर सिद्ध केले तर आम्ही तिघेही राजकारणातून संन्यास घेतो, असे चॅलेंज देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य सरकारची बाजू सावरली. लाठीचार्ज व्हायला नको होता. सरकारने याबद्दल क्षमा मागितली आहे. काही घटक समाजात अस्वस्थता कशी राहिल याचा प्रयत्न करत आहेत, असे म्हणत अजित पवार यांनी विरोधकांनाही लक्ष्य केले.**




मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी विशेष पत्रकार परिषद घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संबोधनानंतर अजित पवार यांनी उपसमितीने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. तसेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार मराठा आरक्षणाविषयी गंभीर आहे, असे सांगायला देखील अजित पवार विसरले नाहीत.

मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी विशेष पत्रकार परिषद घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संबोधनानंतर अजित पवार यांनी उपसमितीने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. तसेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार मराठा आरक्षणाविषयी गंभीर आहे, असे सांगायला देखील अजित पवार विसरले नाहीत. शुक्रवारी सायंकाळी जालना पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटले. ते आदेश वरून देण्यात आले होते, असा आरोप विरोधकांनी केला. त्यांच्या याच आरोपांवरती अजित पवार यांनी आक्रमकपणे उत्तर दिले. समाजात अस्वस्थता पसरविण्याचे काम काही जण करत आहेत. वरून आदेश आला असे सारखे सारखे सांगून दिशाभूल करत आहेत. शंका कुशंका निर्माण करत आहेत आणि त्यातून राजकीय पोळी भाजता येतेय का? याचा प्रयत्न काही जणांकडून चालू आहे. पण जर वरून आदेश आला हे आरोप करणाऱ्यांनी सिद्ध केलं तर आम्ही तिघेही राजकारणातून निवृत्ती घेतो, होऊन जाऊ द्या दूध का दूध-पाणी का पाणी... असे चॅलेंजच अजित पवार यांनी दिले.

- **महाराष्ट्रात संतापाची धग कायम**
- **अनेक महानगरे बंद**
- **ग्रामीण भागात आंदोलने**
- **एसटी बंदमुळे जनजीवन विस्कळीत**

जालन्यामध्ये पोलिसांच्याकडून लाठीचार्ज आणि अश्रूधूरचा प्रयोग करण्यात आला. खरे म्हणजे अतिशय दुर्दैवी प्रकारची घटना आहे. अशा प्रकारच्या बळाचा वापर करण्याचे समर्थन केले जाऊ शकत नाही. मी यापूर्वी देखील पाच वर्ष गृहमंत्री होतो. त्यावेळी जवळपास आरक्षणासंदर्भात दोन हजार आंदोलने झाली. आम्ही त्यावेळी देखील कधी बळाचा वापर केलेला नाही. ज्या निष्पाप नागरिकांना इजा झाली, जे जखमी झालेले आहेत, त्यांच्या प्रती शासनाच्या वतीने क्षमा मागतो, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.



# जनतेचा पैसा 'मित्रों'च्या खिशात घालणारा पंतप्रधान देशाला प्रथमच लाभला : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाच्या सरकारने मागील ९ वर्षात जनतेला वाऱ्यावर सोडून केवळ मुठभर उद्योगपती मित्रांसाठीच काम केले आहे. सातत्याने खोटं बोलणारा पंतप्रधान देशाला प्रथमच लाभला हे देशाचे दुर्दैव आहे. सर्वसामान्य जनतेच्या घामाचा पैसा मित्रोंच्या खिशात घालण्याचे एकमेव काम नरेंद्र मोदी यांनी केले आहे, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. जनसंवाद यात्रेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात नाना पटोले यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथून केली. यावेळी वरोरा-भद्रावती मतदारसंघाच्या आमदार प्रतिभाताई धानोरकर, प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे, चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार सुभाष धोटे आणि हजारोच्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाली होती. यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले की, काँग्रेसप्रणित युपीए सरकारच्या काळात महागाईवर नियंत्रण मिळवण्यात आले होते, गरिबीचे प्रमाण कमी करण्यात यश आले होते. डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील सरकाराने शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले पण मागील ९ वर्षापासून केंद्रात भाजपाचे सरकार आल्यापासून महागाई प्रचंड वाढली, बेरोजगारीत वाढ झाली, शेती व शेतकऱ्याला संपवण्याचे काम सुरु आहे. संविधानिक संस्था संपवण्याचे काम केले जात आहे.

जनतेमध्ये मोदी सरकारविरोधात प्रचंड नाराजी असून भाजपाला सत्तेतून खाली खेचण्याची भावना जनतेमध्ये दिसून येत आहे.

विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा साक्षीदार असलेल्या नगरच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यातून उत्तर महाराष्ट्रातील जनसंवाद यात्रेला सुरुवात करण्यात आली. भुईकोट किल्ल्यातील पंडित जवाहरलालजी नेहरू यांच्यासह क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. लहू कानडे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र नागवडे, शहराध्यक्ष किरण काळे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके, अशोक कानडे, मनोज गुंडेचा, उत्कर्ष रुपवते, नलिनी गायकवाड, संजय झिंगे यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व लोक सहभागी झाले होते.

उत्तर महाराष्ट्रातील साडेतीन हजार गावे जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून एकमेकांशी जोडली जाणार आहेत.

तर माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी नागपूर उत्तर विधानसभा मतदार संघात जनसंवाद पदयात्रा काढली. नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार विकास ठाकरे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाचे प्रमुख विशाल मुत्तेमवार यांनी नागपूर दक्षिण मतदारसंघात जनसंवाद पदयात्रेत सहभाग घेतला.

भाजपा सरकारवर तोफ डागत थोरात म्हणाले की, मराठा समाज या सरकारकडे आशेने पहात होते पण सरकार काहीच हालचाल करत नसल्याने त्यांची निराशा झाली व आंदोलन करण्याची वेळ त्यांच्यावर आली. मविआ सरकार असताना अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षणासाठी उपसमिती स्थापन करण्यात आली होती, या समितीने सातत्याने मराठा आरक्षणासाठी पाठपुरावा केला पण मागील दिड वर्षात शिंदे सरकारने मराठा आरक्षणासाठी काहीही केले नाही. इंडिया आघाडीच्या मुंबईतील बैठकीचा प्रभाव देशभर जाणवू लागल्याने जालन्यातील घटना घडवली काय अशी शंका येते. वन नेशन, वन इलेक्शन व्यवहार्य आहे का हेसुद्धा तपासण्याची गरज आहे, असे थोरात म्हणाले.


# लातूरचे ग्लॅमर म्हणजे दर्जेदार, गुणवत्तापूर्ण शिक्षण

संवाद ज्ञानस्तंभाशी

## वाटचाल 'नवीन लातूर पॅटर्न' घडविण्याकडे!

भाग-२


आधुनिक केसरी



लातूर पॅटर्न संवाद या स्तंभामध्ये पहिल्या भागात लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रावर ओझरता प्रकाश टाकला. लातूर पॅटर्न घडविण्यासाठी अनेक बाबी या मोलाचा आहेत, त्यामुळे लातूर पॅटर्नला एवढा मोठा नावलौकिक कसा मिळतो, त्याला कोणती बाब जर महत्त्वाची आहे ती म्हणजे लातूरचे शैक्षणिक वातावरण. त्यामुळे आपण आज लातूरच्या शैक्षणिक वातावरणावर काही बोलूयात...! प्रत्येक क्षेत्र म्हणजेच सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आदी कोणतेही असो त्या क्षेत्रांत प्रगती साधायची असेल तर त्यासाठी तेथील वातावरण त्या-त्या क्षेत्राच्या विकासासाठी पोषक असावे लागते. त्या अनुषंगाने लातूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा विचार करायला गेले तर शिक्षणासाठी, विद्यार्थ्यांसाठी अत्यंत पोषक असे वातावरण लातूरचे आहे. मागील अनेक दशकांपासून लातूरला शैक्षणिक वलय प्राप्त आहे आणि ते आजही कायम आहे. अनेक पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नागपूर या मेट्रो शहरांना एक ग्लॅमर आहे, तसे लातूरचे ग्लॅमर म्हणजे "दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण" आहे. लातूरच्या विकासाचा "V" म्हणजे विद्यार्थ्यांचा "V" आहे. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक असलेले वातावरण हे लातुरात आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक सर्व पायाभूत सुविधा या लातुरात उपलब्ध असल्यामुळे पालकवर्ग हा निश्चिन्त असतो. सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना रुचेल, आवडेल असे कौटुंबिक वातावरण लातूर शहरात आहे. हे वातावरण आहे तसेच चांगले ठेवण्यासाठी प्रत्येक लातुरकर झगडत असतो. शहरात कायम शांततेचे वातावरण असल्याने सुरक्षित आणि शांत शहर म्हणून लातूरचा लौकिक आहे. शहर आणि शैक्षणिक परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी जेवढी भूमिका लातूरकर निभावतात तेवढी किंवा त्यापेक्षा अधिक जबाबदारी ही पोलीस प्रशासन बजावत असते. शैक्षणिक परिसरात कायम पोलिसांची गस्त असते, मुली-महिला सुरक्षेच्या दृष्टीने दामिनी पथकही 24 अलर्ट असल्याने महिला सुरक्षेचा प्रश्न उद्भवत नाही. सुरक्षेच्या दृष्टीने आयआयबी इन्स्टिट्यूटही कायम नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असते. यामध्ये मागील काही वर्षांपूर्वी इन्स्टिट्यूटने सीसीटीव्ही हे अत्याधुनिक साधन पोलीस प्रशासनला देऊन आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. आता सर्वात महत्त्वाचे म्हणजे लातुरात स्पर्धा ही केवळ शिक्षणात असते. कारण स्पर्धेमुळे गुणवत्तावाढीला मदत मिळते. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी नियमित चाचण्या घेतल्या जातात. ज्यामुळे मुख्य परीक्षा मग ती NEET असो, JEE असो अथवा MHT-CET असो त्यात आपल्याला सिद्ध करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ असते. त्याचबरोबर मागील काही दिवसांपासून विद्यार्थ्यांच्या हितासाठी क्लासेस, वर्गाध्ये विद्यार्थ्यांना स्मार्ट फोन, स्मार्ट व्हॉच अशा साधनांचा वापर कमी करण्यासाठी निर्बंध आणले. त्याचबरोबर कोचिंग क्लासेसच्या विशिष्ट ड्रेसकोडही ठरविण्यात आल्यामुळे आता या वस्तूंवरून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा नाही तर अभ्यासात स्पर्धा होऊ लागली आहे. विद्यार्थ्यांप्रति असलेल्याच जिव्हाळ्यामुळे आज देशभरातून हजारो विद्यार्थी लातुरच्या मातीत येतात आणि घडतात....!



चिराग सेनमा





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

ज्या देशाला साप, नाग आणि गारुड्यांचा देश म्हणून परकीयांकडून आतापर्यंत हिणवले जात होते, त्याच देशाने केलेली ही नेत्रदीपक प्रगती आहे हे सांगताना मला प्रचंड अभिमान वाटतो. आजही या मोहिमेच्या यशासाठी काही ठिकाणी पूजापाठ, होमहवन, प्रार्थना करण्यात आल्या. त्यामागील लोकांची सद्भावना आणि देशप्रेम आपण समजून घेतले पाहिजे. अर्थात विज्ञानातील कोणतेही यश हे वैज्ञानिक कसोट्यांचे संपूर्ण पालन केल्यानंतरच मिळत असते हेही आपण त्याबरोबर लक्षात ठेवले पाहिजे. या मोहिमेच्या यशाबद्दल थोडक्यात सांगतो म्हणजे आपल्याला आपल्या ' विक्रमाची ' कल्पना येईल. सुमारे सहा हजार किमी इतक्या प्रचंड वेगात आपली परिक्रमा करणाऱ्या यानाचा वेग फक्त १० किमी प्रति तास इतका कमी करणे आणि आडवे धावणाऱ्या यानास अचानक उभे करून पृष्ठभागावर उतरवणे ही गोष्ट कल्पनाही करता येणार नाही इतक्या गुंतागुंतीची आहे. म्हणूनच हे यश महत्वाचे ठरते. गेल्या ७० वर्षात विविध देशांनी जवळपास १११ चांद्रमोहिमा हाती घेतल्या. त्यातील फक्त आठ यशस्वी ठरल्या. त्यातील आजची नववी. म्हणूनही हे यश अभूतपूर्व आहे. मित्रहो, कोणतेही यश एकाएकी मिळत नाही. पहिल्या चांद्रयान मोहिमेनंतर ११ वर्षांनी आपली दुसरी चांद्रयान-२ मोहीम अयशस्वी ठरली तरी आपल्या वैज्ञानिकांचा आत्मविश्वास तसूभरही कमी झाला नाही. सतत शिकणे, अपयशी होणे, अपयशातून शिकणे, नवनवीन प्रयोग करीत राहणे हे त्यांनी सुरूच ठेवले. त्याच प्रयत्नातून मिळालेले हे यश आहे. ऑगस्ट महिना हा आपल्या देशाच्या दृष्टीने खूप महत्वाचा आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. आणि याच ऑगस्ट महिन्याच्या २३ तारखेला २०२३ मध्ये आपण यशस्वीपणे चंद्रयान-३ मोहीम यशस्वी केली. यापुढे २३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. भारतीय आणि चंद्राचे खूप जुने प्रेमळ नाते आहे. हा चांदोबा, चांदोमामा आता आपल्या जवळ आला आहे. खऱ्या अर्थाने ' मामाच्या गावाला जाऊ या ' असे आपल्याला आता म्हणता येणार आहे. ही एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. चंद्र आहे साथीला आणि साक्षीला सुद्धा ! ' या शब्दात डॉ रावांनी आपल्या व्याख्यानाचा समारोप केला. उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी डॉ राव यांचे आभार मानले. श्यामराव, श्यामलाताईंनी डॉ राव यांना भेटून राजेश आणि पिंकीची ओळख करून दिली.



## समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

## अंतर्मनावर कोरलेल्या भावना सतत आठवण्याचा छंद

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

गतकाळातील घटना, अनुभव सहजपणे विसरणे शक्य नसतं; हे जरी कितीही खरं असलं, तरीही त्यांमध्ये मनानं गुरफटून राहणं देखील तापदायक ठरू शकतं, हे विसरून चालणार नाही. काहीवेळा काही बाबतीत आपल्या पूर्वानुभवाचा उपयोग निश्चितच आपल्याला होतो, पण तसं नेहमीच अपेक्षेप्रमाणे घडतं असं नाही. हे जाणून घेण्याचा आपल्या मनांत विचारही अनेकदा येत नाही. आपल्या भावविश्वात रममाण झालेलं आपलं अंतर्मन आपल्या साठवणीतल्या आठवणींना अनन्यसाधारण महत्व देत असतं. अर्थात काही आठवणीच असतात तशा, अंतर्मनांत घर करून राहिलेल्या. ह्यामध्ये अनेक सुख- दुःखाचे क्षण, घटना, घडमोडी, संवाद, वाद असं सर्व काही नुसतं सामावलेलं असतं असं नाही तर, ते अंतर्मनावर कोरलं गेलेलं असतं. आपल्याला अगदी लहानपणापासूनच जे मिळालं, हाती लागलं, मनांत आलं ते सारं काही साठवून ठेवायची सवयच लागून राहिलेली असते. अनेकांना, विकत घेतलेली पहिली वस्तू, कपडे, मिळालेलं गिफ्ट, बक्षीस, ग्रीटिंग, शालेय वस्तू अशा अनेक वस्तूंचा साठा करून त्या वस्तूंशी निर्माण झालेलं भावनिक नातं टिकवून ठेवायला आवडतं. एक छंद म्हणून त्याची साठवणूक करणं काही काळापर्यंत ठीक आहे. पण आपण ह्या आठवणीतील वस्तूंवर अवलंबून राहून अनेकवेळा विचार, वर्तन आणि व्यवहार करायला लागतो. ते काही वेळा धोकादायक आणि अगदी घातकही ठरू शकतं; ह्याचा आपण गांभीर्यानं विचार कधी करतोच असे नाही. अनेकदा भावनेच्या आहारी जाऊन घेतलेल्या निर्णयामुळे पश्चात्ताप होण्याची शक्यता असते. याची वेळीच जाणीव होणं महत्वाचं आहे. अर्थात, काही आठवणी साठवणीतल्या असतात, त्या खरं तर आपल्या अंतर्मनावर कोरल्या गेलेल्या असतात. ठरवलं तरीही त्या पुसल्या जात नाहीत, म्हणूनच विसरायला होत नाहीत.



आधुनिक केसरी

### पुण्याचे साधन | शुद्ध वाणी

सांगाती रहातो | सदासर्वकाळ ||
विश्वास अटळ | आत्माराम ||१||
जगणे मरणे | सम ज्याचे झाले ||
त्याचे ठायी आले | संत रूप ||२||
विकारी गुंतता | नाश होतो मना ||
पाश सोडवेना | मायाजाल ||३||
सुख दुःख दोन्ही | एक दृष्टी पाहे ||
स्थितप्रज्ञ राहे | अंतरात ||४||
सत्कर्मा वाचूनी | नाही समाधान ||
पुण्याचे साधन | शुद्ध वाणी (संत वाणी) ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

दुर्गतिं सुगतिं कृत्वा सहजं कुरु जीवनम्|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्|| ८२ || दुर्गतीला सुगती करून माझे जीवन सहज कर. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ब्रह्मविद्या परकाश में, मोह भूत भ्रम जाय ।
विहवल प्रेम प्रवाह में, शब्द में सुरति समाय
।।११।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय)
०४/१०/११
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्येच्या प्रकाशात विषयासक्तीने उत्पन्न झालेले अज्ञान नष्ट होऊन जाते आणि आत्मा जगताच्या दुःखाने व्याकुळ होऊन प्रभूच्या प्रेम प्रवाहा द्वारे शब्द परम पुरुषात म्हणजेच परमेश्वरात आपल्या चेतन शक्ती सुरतीचा प्रवेश करवितो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सिध्दलक्षण

आधुनिक केसरी






सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सिध्दावस्था सम स्थितीत वावरणे,भेदभाव विरहित सतत सत्कर्म करत रहाणे.सिध्दाचे सिध्दांत व त्याची लक्षणे,
सर्व भूतमात्रेत एकचं आत्मा समत्वाने वावरतो.त्याची लक्षणे सांगायची झाल्यास मी तर म्हणेन की तो निर्दोष,निर्णय,निःस्वार्थ, निष्काम,निर्मल,सम अत्यंत पवित्र अशा अंतरंगात वावरणाऱ्या "जीव "म्हणजे सिध्दी पुरूष होय.सिध्द पुरूषांची अवस्था एवढी खाजगी व सुक्ष्म असते की ती शब्दाने सांगता येत नाही. सर्व चराचरांत आत्मरूपने तो भरून रहातो.कोणताही सिध्दपुरूष मी अमुक एक केलं असं चुकूनसुद्धा म्हणत नाही.आत्मप्रौठी त्यांना अमान्य असते.जे जे विश्वाच्या कल्याणासाठी झटले ते ते सिध्दपुरूष म्हणून गौरवले गेले आहेत.

## वाचनाची आवश्यकता आणि मर्यादा

आधुनिक केसरी

पोथ्या आणि संतांचे ग्रंथ आपण मोठ्या प्रेमाने वाचतो आणि सांगतो, पण तशी कृती करीत नाही म्हणून आपण देवाला अप्रिय होतो. संतांचे ग्रंथ हे अगदी प्रिय व्यक्तीच्या पत्राप्रमाणे मन लावून वाचावेत. हा ग्रंथ माझ्याचकरीता सांगितला आहे. तो कृतीत आणण्याकरिता आहे, ही भावना ठेवून वाचन करावे. ग्रंथ लिहीणाराची तीव्र इच्छा असते की, त्याप्रमाणे लोकांनी आचरण करावे. त्यावरची टीका वाचताना मूळ ग्रंथातला मथितार्थ लक्षात आणावा. भाषांतरकार हा भाषांतरामध्ये आपले थोडे घालतोच; मूळ ग्रंथ वाचणे हे केव्हाही चांगले. संतांचे ग्रंथ हे आईच्या दुधासारखे, तर टीका अणि भाषांतर हे दाईच्या दुधासारखे आहेत, हा फरक जाणून घ्यावा. कित्येकांच्या बाबतीत वाचन हे सुद्धा एक व्यसन होऊन जाते. उगीच वाचीत बसण्यात फायदा नाही. नुसत्या वाचनाने काही साधत नाही. जितके वाचावे तितका घोटाळा मात्र होतो. वाचावे कुणी ? तर ज्याला पचविण्याची शक्ती आहे त्याने. बाकीच्या लोकांनी फार वाचू नये; त्यातही, वर्तमानपत्र वाचीत वेळ घालविणे, म्हणजे आपण होऊन जगाला घरी बोलावणे होय. वाचनाचे मनन झाले पाहिजे. मनन झाले की ते आपल्या रक्तामध्ये मिसळते. वाचन आणि साधन बरोबर चालावे. मग साधकाला वाचनापासून खरा अर्थ कळतो आणि आनंद होतो. साधन आणि वाचन असले की साधक कधीही मागे पडायचा नाही. उपनिषदे, गीता, योगवसिष्ठ, यांसारखे ग्रंथ वाचणे आणि समजावून घेणे, आपल्या उपासनेला आवश्यक असते. गीता ही सर्व ग्रंथांची आई आहे. प्रवृत्ती आणि निवृत्ती, कर्मयोग आणि कर्मसंन्यास, यांचे एकीकरण करण्यासाठी गीता सांगितली आहे, हे लक्षात ठेवून ती वाचावी. वेदान्त हा आचरणात आणल्याशिवाय त्याचा उपयोग नाही. हितकारक गोष्ट आचरणात आणलीच पाहिजे. समजा, आपण एका गावाला जायला निघालो आहोत आणि मोठ्या रस्त्याने जातो आहोत. वाटेत एक माहीतगार इसम भेटला आणि त्याने आपल्याला जवळची एक पायवाट दाखविली. त्या पायवाटेने आपण आपल्या गावी लवकर पोहोचतो. तसे उपासनेच्या मार्गामध्ये स्वतःचा दोष स्वतःला कळत नाही, आपले मन ताळ्यावर रहात नाही. अशा वेळी गीतेसारख्या ग्रंथांच्या वाचनाने आपला दोष आपल्याला कळतो. आणि आपली चूक आपल्याला कळली तर आपण लवकर सुधारतो.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

तरी त्याचा अर्थ हा की, गुरूने दाखविल्याशिवाय तो परमात्मा भेटत नाही. गुरु आज्ञेत राहिल्यास सर्व गुरुरूपच दिसू लागते. सर्व ठिकाणी गुरुरूप दिसू लागल्यावर जगात वाईट असे काहीच राहात नाही, कारण मग वाईटाला जागाच राहात नाही. गुरु आज्ञा हेच सत्य. त्यावर इतका विश्वास ठेवा, की त्याशिवाय जगातदुसरे काही नाही. एवढा विश्वास अंगी बाणल्यावर देव काही लांब नाही, तुमच्याजवळच आहे. प्रपंचावर जी आसक्ति करता ती तिथून काढून परमार्थावर ठेवा, म्हणजे परमार्थ कठीण नाही. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजेच आपला मीपणा नाहीसा करणे होय. मी पणा समूळ मेल्याशिवाय अनन्य शरण जाता येणार नाही. मीपणा हा गुरूने सांगितलेले नामस्मरण करीत राहिल्याने जातो. म्हणूनच सतत नामस्मरण करीत असावे. कुठला तरी भोग भोगणे आहेच .तेव्हा किमान आपल्या पेक्षा जास्त वाइट भोग भोगणाऱ्या कडे पाहुन तरी भोग आनंदाने भोगावा तेथेच गुरूंचे अधिष्ठान असते.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अन्नदानं परं दानं विद्यादानमतः परम् ।
अनेन क्षणिका तृप्तिर्यावज्जीवं च विद्यया ||
सरलार्थ – अन्नदान हे श्रेष्ठ तर खरेच; पण विद्यादान हे त्याहून श्रेष्ठ आहे. कारण अन्नाने जी तृप्ती होते, ती तात्कालिक असते. विद्येने मिळणारी तृप्ती यावज्जीव उपभोगता येते.
स्पष्टीकरण - भुकेल्याला अन्नदान करणे हे गृहस्थाचे मुख्य कर्तव्य होय. तो त्याचा धर्मच असतो. कारण भूक हे जिवंत मरण असते. पण एकदा अन्न मिळाले म्हणून कायमची भूक भागत नाही. ते दुपार-संध्याकाळ मिळत राहावे लागते. ज्ञानाचे तसे नाही. एखाद्याला जर आपण विद्या दिली, तर ती त्याला कायमची उपयोगी पडते. म्हणून ज्ञानदान है सर्वश्रेष्ठ दान होय !

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ५ सप्टेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari






# शिक्षकांच्या पाल्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारणार : टीम आयआयबी

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** आयआयबी इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेणाऱ्या शिक्षकांच्या पाल्यांचे शैक्षणिक पालकत्वाची जबाबदारी आता आय आय बी घेणार असून त्यांच्यासाठी 1 ऑक्टोबर पासून स्वतंत्र बॅच सुरू करण्यात येणार असल्याचे एकता पुरस्कार प्राप्त आय आय बी चे संचालक प्रा. चिराग सेनमा यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या पालकांशी संवाद कार्यक्रम प्रसंगी घोषणा करून उपस्थितांना सुखद धक्का दिला. 5 सप्टेंबर हे शिक्षक दिनाचे औचित्य साधून आय आय बी इन्स्टिट्यूट च्या वतीने पालकांशी संवाद साधून पालकांचे म्हणणे ऐकून घेतले, यावेळी विशेषत्वाने देशाची भावी पिढी घडविणाऱ्या शिक्षकांचीच आपल्या पाल्याप्रती चिंतीत असल्याचे चिराग सरांच्या निदर्शनास आले, तेव्हाच सम्पूर्ण समाजाच्या जडणघडणीची जबाबदारी असलेल्या शिक्षकांना दिलासा देण्यासाठी आय आय बी इन्स्टिट्यूटचे संचालक चिराग सेनमा यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून आदर्श ठरणारी संकल्पना मांडली. शिक्षणामध्ये फक्त व्यावसायिक दृष्टीकोन न ठेवता आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो या सामाजिक भावनेतून शिक्षकांच्या पाल्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याच्या संकल्पनेचा सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या इन्स्टिट्यूट च्या नवीन व कौतुकास्पद संकल्पनेचे स्वागत करून, सर्व शिक्षक वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. व चिराग सरांचे व टीम आय आय बी चे शिक्षकाप्रती असलेला आदरभाव दिसून येत असल्याचे मत शिक्षक वर्गातून व्यक्त केले जात होते. याबरोबरच शिक्षक व त्यांच्या पाल्यांसाठी असा अभिनव उपक्रम राबविणारी आय आय बी ही देशातील पहिली संस्था व प्रा. चिराग सर हे पहिले संचालक असल्याचे शिक्षकानी यावेळी आवर्जून सांगितले. यावेळी सर्व शिक्षकांचा यथोचित सत्कार सन्मान करण्यात आला.

**देशातील पहिलाच स्तुत्य उपक्रम**



# शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने निघाली चंद्रपूरातून जनसंवाद यात्रा

## ५ सप्टेंबरला गांधी चौकात जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकारच्या धोरणांचा पदार्फाश करण्यासाठी चंद्रपूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीने रविवारी, ३ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ६ वाजता महाकाली माता मंदिर, चंद्रपूर येथून जनसंवाद यात्रा निघाली.

या यात्रेत चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, आमदार सुभाष धोटे, आमदार प्रतिभाताई धानोरकर, आमदार सुधाकर अडबाले, चंद्रपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रितेश (रामु) तिवारी, माजी अध्यक्ष विनायक बांगडे, माजी अध्यक्ष सुभाषसिंग गौर, विनोद दत्तात्रेय, के. के. सिंग, दिनेश चोखारे, माजी नगरसेवक संतोष लहामगे, माजी नगरसेवक गोपाल अमृतकर, चंद्रपूर ग्रामीण महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष नम्रता ठेमस्कर, शहर महिला काँग्रेस अध्यक्ष चंदाताई वैरागडे, माजी महापौर संगीता अमृतकर, प्राचार्य नरेंद्र बोबडे, युवक काँग्रेस अध्यक्ष राजेश अडूर, काँग्रेस नेते महेश मेंढे, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष भालचंद्र दानव, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष प्रशांत दानव, ओबीसी सेलचे शहर अध्यक्ष राहुल चौधरी, अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष ताजुद्दीन शेख, विजय नळे, प्रशांत भारती यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

या यात्रेत उपस्थित मान्यवरांनी चंद्रपूरचे आराध्य दैवत माता महाकाली देवीचे पुजन केले. त्यानंतर माता महाकाली मंदिर येथून पदयात्रा निघाली. गांधी चौक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले. गांधी चौक येथे सेवादल काँग्रेस चंद्रपूरद्वारा ध्वजारोहण कार्यक्रम झाला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे शहराच्या प्रमुख मार्गाने ही जनसंवाद यात्रा निघाली. आझाद बगीचा येथे जनसंवाद साधण्यात आला. त्यानंतर पदयात्रा पुन्हा मार्गस्थ झाली. कामगार चौक, नेहरू स्कुल घुटकाला येथे सभेनंतर समारोप झाला. यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यावेळी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाषजी धोटे यांनी सांगितले की, चंद्रपूर जिल्ह्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेस पक्षाने जनसंवाद यात्रेचे आयोजन केले आहे. या यात्रेतून पक्षाच्या धोरणांविषयी जनतेला माहिती देण्यात येईल. तसेच, जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील. आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सांगितले की, काँग्रेस पक्ष नेहमीच जनतेच्या सोबत आहे. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी पक्षाने कोणतीही कसर सोडणार नाही. आमदार सुधाकर अडबाले म्हणाले की, काँग्रेस पक्ष जनतेचा पक्ष आहे. पक्षाच्या धोरणांमुळे देशात विकास झाला आहे. सध्याच्या मोदी सरकारच्या धोरणाचा विरोध करण्यासाठी ही पदयात्रा आहे. या जनसंवाद यात्रेत महिला काँग्रेस, युथ काँग्रेस, एनएसयुआय, ओबीसी विभाग, अनुसूचित विभाग, अल्पसंख्यांक विभाग, इंटक, प्रोफेशनल काँग्रेस, पर्यावरण विभाग व इतर सर्व विभागाचे पदाधिकारी, चंद्रपूर शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**५ सप्टेंबरला गांधी चौकात जाहीर सभा :** आजपासून सुरू झालेली ही यात्रा १२ सप्टेंबरपर्यंत राहणार आहे. ५ सप्टेंबरला सकाळी ६ वाजता तुकुम प्रभागातील मातोश्री विद्यालय येथून सुरु होणाऱ्या यात्रेत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले सहभागी होणार आहेत. यावेळी ते चंद्रपुरातील जनतेशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता गांधी चौकात जाहीर सभा होणार आहे. यावेळी काँग्रेसच्या सर्व फ्रंटल आर्गनायझेशनच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांनी केले आहे.

# आधुनिक केसरीने जनचर्चेतून महत्त्वपूर्ण मंथन घडवले

आधुनिक केसरी न्यूज

दैनिक आधुनिक केसरीच्या 3 सप्टेंबर 2023 च्या अंकातील आधुनिक केसरी जनचर्चेत " शाळा, महाविद्यालय आणि कोचिंग क्लासेस मध्ये मूल्य शिक्षण रुजवा" या विषयावर संवेदनशील चर्चा घडवून आणलेली वाचली. या जनचर्चेत मान्यवरांकडून व्यक्त झालेली मते सध्या समाजाने आचरणात आणणे गरजेचे आहे. शैक्षणिक मूल्यांची घसरण होत जाणे ही समाजासाठी घातक ठरणारी बाब आहे. म्हणून या विषयाचे मी मानसोपचारतज्ञ म्हणून विश्लेषण करताना सांगेल की, एकंदरीतच जगामधे व भारतामधे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढत आहे. डिप्रेशनचे प्रमाण वाढत आहे. वाढत्या व अयोग्य अपेक्षा,आपली कुवत वा आवड न ओळखता केवळ कौंटुबीक दबावामुळे अथवा पीअर प्रेशरमुळे कठीण अभ्यासक्रम निवडल्या जातो. बहुतेक कुटुबांची आर्थिक स्थिती भक्कम असते व म्हणून अश्या क्लासेसची फी आनंदाने देतात. सुखवस्तु कुटुंबातुन आलेली अशी मुलं अपयश किंवा अपयशाची चाहूल पचवू शकत नाहीत व त्यातुन येणाऱ्या नैराश्यातुन अश्या घटना घडतात. आधीच अपरिपक्व मन व शिवाय योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे अयोग्य करिअर ची निवड केल्या जाते. कोर्स निवडतांना पाल्याचा बुध्यांक , भावनिक बुध्यांक व नैर्सगिक आवड कश्यात आहे हेही ओळखून पालकांनी व गुरुजनांनी मुलांना मार्गदर्शन करावे. मी तर म्हणेन की असे क्लासेस चालविण्याऱ्या संस्थांनी सुद्धा या बाबी लक्षात घेऊन प्रवेश द्यावा. शिक्षणाचे बाजारी करण होऊ देऊ नये . यामुळे अश्या अप्रिय घटना टाळता येतील. एकंदरीतच दैनिक आधुनिक केसरी अशा वैविध्यपूर्ण घडामोडींवर सातत्याने विचार व्यक्त करत असते ती समाजहिताची वाटते. या चर्चेत व्यक्त झालेल्या मंथनातून मार्ग निघतात. पुढेही अशाच संवेदनशील मुद्द्यावर जनचर्चेतून विचारमंथन घडो ही अपेक्षा आहे. यानिमित्ताने आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे, जनचर्चेचे संयोजक बाळासाहेब जोगदंड आणि आधुनिक केसरी परिवाराचे अभिनंदन..!






**डॉ. अविनाश जोशी**
प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ नागपूर

# वडोदबाजार येथे मराठा समाजाच्या वतीने बंद

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे रविवारी कडकडीत बंद पाळण्यात आला जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात असलेल्या अंतरवली गावात मराठा समाजाच्या वतीने आरक्षणासाठी आंदोलन सुरू असताना मराठा समाज बांधवांवर पोलिसांनी पोलिसांनी लाठी चार्ज करून जखमी केल्याच्या घटनेवरून राज्यभरात सरकार विरुद्ध तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे. वडोद बाजार येथे कडकडीत बंद पाळून निषेध व्यक्त करण्यात आला. या घटनेचा निषेध म्हणून वडोद बाजार येथे सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने वडोद बाजार येथील बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आली रविवारी सकाळी पहाटेपासूनच वडोद बाजार येथील व्यापारी बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती. एक मराठा लाख मराठा आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं अशा घोषणा मराठा सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने देण्यात आल्या व शांततेच्या मार्गाने बंद पाण्यात आला. यावेळी सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शी जिनपिंग यांची अनुपस्थिती

आधुनिक केसरी

भारताची राजधानी दिल्लीत येत्या शनिवारी व रविवारी (९-१० सप्टेंबर) जी-२० शिखर परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेला जगभरातील अनेक प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेनही उपस्थित राहणार आहेत. मात्र, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग या बैठकीला अनुपस्थित राहणार असल्याची चर्चा आहे. जिनपिंग उपस्थित राहणार नसल्याने राष्ट्राध्यक्ष बायडेन निराश झाले आहेत. अमेरिकेत पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी याबाबत वक्तव्य केलं. भारत आणि व्हिएतनाम देशांच्या दौऱ्यासाठी उत्सुक आहात का? असे विचारले असता बायडेन म्हणाले, होय, मी उत्सुक आहे. दरम्यान, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग हे या परिषदेला उपस्थित राहणार नसल्याच्या वृत्तावर भाष्य करताना बायडेन म्हणाले, मी निराश झालो आहे. पण मी त्यांना लवकरच भेटणार आहे. या वर्षाच्या अखेरीस सॅन फ्रान्सिस्को येथे आशिया-पॅसिफिक इकॉनॉमिक कोऑपरेशन फोरमची परिषद होणार आहे. या परिषदेत बायडेन आणि जिनपिंग यांची भेट होण्याची शक्यता आहे. व्हाईट हाऊसने दिलेल्या माहितीनुसार, बायडेन ७ सप्टेंबरला (गुरुवारी) भारतात येणार आहेत. ८ सप्टेंबर रोजी शिखर परिषदेच्या आधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर त्यांची द्विपक्षीय बैठक होणार आहे. राजधानी दिल्लीत पार पडणाऱ्या जी-२० शिखर परिषदेला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज, जर्मनीचे चान्सलर ओलाफ स्कोल्झ, ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा आणि ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला-द-सिल्वा आदि नेते उपस्थित राहणार आहेत. तथापि, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग हे या परिषदेला गैरहजर राहण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबतची लेखी पुष्टी अद्याप झाली नाही.

# आरक्षण आणि वास्तविकता



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर लाठीचार्ज करून सरकारने आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा तिव्र निषेध प्रत्येक घटका मधून झाला परंतु केवळ निषेध करून समस्या सुटणार आहेत का? हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. दुसरा प्रश्न म्हणजे आरक्षच मिळवायचे तर आक्रमक होऊन आपल्याच तरुणांवर गुन्हे दाखल करून घेणे आहे का? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे नाही असतील तर आपल्याला वस्तुस्थिती अर्थात वास्तविकता लक्षात घेणे गरजेचे आहे. . आरक्षण समजून घेताना आपल्याला आरक्षणाच्या मागचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. तो समजल्या शिवाय आरक्षणाचे महत्त्व कळणार नाही. राजर्षी शाहु महाराज यांनी आपल्या संस्थानात बहूजन समाजाला पन्नास टक्के आरक्षण दिले.**

कारण तेव्हा प्रत्येक क्षेत्रात ब्राम्हणांचे वर्चस्व असुन ब्राह्मण जातीभेद व अस्पृश्यता पाळत होते. तसेच बहुजन समाजातील लोकांना शिक्षण, नोकरी आणि इतर विकासाच्या क्षेत्रात कोठेही स्थान नव्हते. ब्राह्मण वर्गाचे एकांगी व अन्याय कारी वर्चस्व वाढत होते. म्हणून ब्राम्हणांचे एकांगी व अन्यायकारी वर्चस्व कमी करण्यासाठी व सामाजिक समता स्थापण करण्यासाठी आणि प्रत्येकाला विकासाची समान संधी मिळावी म्हणून आपल्या राज्यात राजर्षी शाहु महाराज यांनी आरक्षण लागु केले. म्हणजे ज्यांना आपल्या सोबत बसणे, उठणे पसंत करत नव्हते त्या लोकांना शाहु महाराज यांनी ब्राह्मण यांच्या सोबत काम करायची संधी निर्माण करून दिली. ब्राह्मणांसोबत बहूजन समाजातील लोकांना समान संधी निर्माण झाली म्हणून ब्राह्मण वर्गाने राजर्षी शाहु महाराज यांच्या वर टिका करून आरक्षणाचा विरोध करून शाहु महाराज धर्म बुडवायला निघाले असे बोलुन शाहु महाराज यांच्यावर वेगवेगळ्या माध्यमातून टिका करत होते. हजारो वर्षांपासून चालत आलेली जातीव्यवस्था व जातीव्यवस्थेच्या माध्यमातून लादलेली मानसिक व धार्मिक गुलामी मानसाच्या विकासासाठी अडसर ठरत आहे आणि ती नाहीसी करण्यासाठी आरक्षण प्रभावी उपाय होता. जातीव्यवस्था व विषमतेची भावना दिर्घकाल राहील आणि याच जातीवाद व विषमतेची भावना इतर लोकांचा विकास होऊन देणार नाही म्हणून आरक्षणाची तरतूद संविधानामध्ये केली गेली. सामाजिक दृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या जातींना आरक्षण देण्याची तरतुद बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. 340 कलम नुसार ओबिसी म्हणजे इतर मागासवर्गीय लोकांना आरक्षणाची तरतूद बाबासाहेब आंबेडकर यांनी केली परंतू तत्कालीन सरकारने ने ओबिसीच्या आरक्षणाला विरोध केला. 340 नुसार ओबीसी ची जातीनिहाय यादी तयार करताना त्यात मराठा चा समावेश होऊच नाही म्हणून आवाज उठवला गेला. आरक्षण म्हणजे भिक होय ते आम्हाला नको अशा प्रकारची विदुषणे दिल्या गेली. तत्कालीन मराठा नेते ज्यांनी शाहु महाराज यांचा छळ केला, ज्यांनी शाहु महाराज त्यांचे आरक्षण यांच्या वर टिका केली त्याच विचारसरणीच्या लोकांचे ऐकुन मराठा समाज स्वतः ला मागास समजून घ्यायला तयारच नव्हता. उलट स्वतः ला क्षत्रियकुलवंत म्हणून स्वतः च स्वतः ची पाठ थोपडून घेऊन विषमतावादी पिलावळीचे हात मजबूत करत होता. ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहाचे विद्रुपीकरण केले, ज्यांनी शाहू महाराज यांना त्रास दिला मराठा समाज त्यांच्या च मागे उभा राहिला परिणामी मराठा समाज राजश्री शाहु महाराज यांचा द्वेष करायला लागला. आजही काही च लोक सोडले तर मराठा समाज शाहु महाराज यांचे नावही घेऊ शकत नाही. ज्या मराठा छत्रपती शिवाजी महाराज, सयाजीराव गायकवाड, शाहु महाराज या राज्यांनी जातीभेद नष्ट करून माणसाला माणसाची वागणूक देऊन सन्मान केला त्याच मराठा समाजाने जातीव्यवस्थेचे पालन करून स्वतः ला मागास न म्हणता प्रगत गटात मोडले हीच सर्वात मोठी चुक झाली. आणि विषमता वादी व्यवस्था ज्यांना मान्य असलेल्या मनुच्या पिलावळींना हिताचे होईल असे वागत गेले. सत्य तर हे आहे की मनुची पिलावळ आजही मराठा समाजाला शुद्रच समजते परंतु जाती धर्माच्या नावाखाली मराठा समाज मनुच्या पिलावळींच्या चुकीच्या गोष्टींचेही समर्थन करतात. म्हणुन मनुची पिलावळ जी सत्तेत आहे ती आजही मराठा शुद्र असल्याने त्यांना बरोबरीने स्थान देत नाहीत केवळ त्यांचा वापर करून सत्ता भोगण्यात मनुची पिलावळ यशस्वी झाली. विषमता, अस्पृश्यता, जातीवाद हा मराठा समाजाने निर्माण केला नसला तरीही यावर बोलले तर मराठा समाजाच्या भावना दुखतात. याचाच दुसरा अर्थ मराठा समाज केवळ मनुवादी लोकांची ढाल म्हणून काम करताना आपल्याला दिसत आहेत. जे मराठा बांधव फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारावर चालुन मराठा समाजाने अंधविश्वास व पाखंड यातून बाहेर येऊन मागणाऱ्या पेक्षा देणारे व्हावे, मागणारे व देणारे यांचा धर्म एक कधीच नसतो, मनुची पिलावळ केवळ विषमता, द्वेष पसरून राजकीय पोळी भाजून घेतात अशा प्रकारचे प्रबोधन करतात त्याच मराठा बांधवांना इतर मराठा बांधव पुरोगामी म्हणून हिनवत असतील तर मराठा समाजाच्या मुळ समस्या कधी संपणार हा चिंतेचा विषय आहे. जोपर्यंत माणूस जागृत होऊन सत्ता हस्तगत करणार नाही तोपर्यंत समस्या मिटणार नाहीत. वर्ण व्यवस्थेने मराठा समाजावर अन्याय अत्याचार केलेले आहेतच त्यांना हक्क अधिकार नाकारले आहेतच परंतु मराठा समाजाला सर्वांगीण विकास करून घेऊन छत्रपती शिवाजी महाराज व राजश्री शाहु महाराज यांचे विचारावर समाज व्यवस्था निर्माण करायची असेल तर अगोदर या विचार धारेचे शत्रु ओळखणे आवश्यक आहे. आज मराठा समाजाचे आमदार खासदार संख्येने जास्त आहेत, मराठा समाजाच्या शिक्षण संस्था जास्त आहेत तरीही मराठा समाजाच्या समस्या वाढतच आहेत याचे कारण मराठा समाजाचे आमदार खासदार जास्त असले तरीही सत्ता मात्र मराठा समाजाची नाही. बहुसंख्य मराठा समाज असलेल्या महाराष्ट्रात महाराष्ट्राचा मुख्यमंत्री मराठा समाज ठरवून शकत नाही याचा अर्थ मराठा समाज सत्तेत नाहीच. जो समाज आपला मुख्यमंत्री ठरवू शकत नाही त्या समाजातील आमदार खासदार समाजाला न्याय मिळवून देतील का? हा संशोधनाचा विषय आहे. कॉंग्रेस काळात महाराष्ट्राचा मुख्यमंत्री चँटर्जी, बँनर्जी, मुखर्जी ठरवायचे. आणि आता फडणवीस शहा ठरवतात. मुख्यमंत्री कोण असावा हेच मराठा समाज ठरवू शकत नसेल तर विचार करा आजही मराठा समाज स्वतः चा निर्णय स्वतः घेत नाही. मग मराठा समाज कोणाचे ऐकतो? आज आम्ही छत्रपती शिवाजी महाराज, शाहु महाराज यांना जिवापेक्षा जास्त माणतो. परंतु त्यांच घराण्यातील व्यक्ती महाराष्ट्रात मुख्यमंत्री होऊ शकत नाही. याचा अर्थ छत्रपती शिवाजी महाराज व धर्माचा वापर केवळ राजकारणासाठी केला जातो. मराठा समाज व छत्रपतींचा आदर याविषयी सत्ताधारी लोकांना काही घेण देण नाही. मराठा आरक्षण विषय केवळ तापवून त्यावर राजकारण केले जात आहे. पण न्याय दिला जात नाही. मराठा हे मागास आहेत व ते ओबिसी आहेत म्हणून मराठा शब्द ओबीसी च्या यादी मध्ये समाविष्ठ करून ओबिसीची जातीनिहाय जनगणना करून त्या प्रमाणात आरक्षण दिले तर क्षणात प्रश्न मार्गी लागतो. पण आरक्षणाला ज्यांचा विरोध होता आज मराठा समाज त्याच वर्गाला आरक्षण माघत आहे. हा विरोधाभास कसा निर्माण झाला यावर स्वतः ला हिंदु समजणाऱ्या संघटना बोलत नाहीत आणि वैचारिक मराठा बांधवाचे कोणी ऐकत नाहीत. जे फडणवीस सत्तेत असताना महाधिवक्ता अशीतोष कुंभकोणी यांना मराठा आरक्षणाची बाजु मांडू देत हे स्वतः कुंभकोणी सांगतात विरोधी पक्षात गेल्यावर सरकारला देण्याची नीतीमत्ता नाही म्हणून टिका करतात, आणि पुन्हा सत्तेत आल्यावर मराठा आंदोलन कार्यकर्त्यावर लाठीचार्ज करतात व वरून सांगतात लाठीचार्ज सौम्य होता. याचाच अर्थ फडणवीस आरक्षण देणार नाहीत. कायदेशीर बाबी न तपासता केवळ निवडणूक जवळ आल्या म्हणून घोषणा करतील परंतु त्यांचाच जवळचे वकील पुन्हा न्यायालयात जातील आणि न्यायालयात गेल्यावर काय होते हे सर्वांना माहिती आहे. म्हणून मराठा समाजाने मागण्यापेक्षा देणारे झाले तर मराठा समाजाच्या समस्याच मिटतील परंतु त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज व शाहु महाराज हे समजून घेऊन त्यांचे विचार स्विकारावे लागतील तरच वास्तविक परिस्थिती समजेल परंतु विषमता वादी मनुची पिलावळ फक्त छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेते विचार नाही. आणि ब्राम्हणांची केवळ शाहु महाराज यांच्या वर टिकाच केली परंतु आजही मराठा समाजाने शाहु महाराज यांना घरात आणले नाही, त्यांना वाचुन समजून घेतले नाही एवढा मोठा मराठा राज्यांचा द्वेष मराठा च करतील तर याचा फायदा मनुचे पिलावळ घेऊन मराठा समाजाचा केवळ वापर करून घेतील व समस्या ग्रस्त करून सोडतील म्हणून आरक्षणा सोबतच इतरही वास्तविक परिस्थिती मराठा समाजाने समजून घेणे आवश्यक आहे. मराठा समाजाच्या फक्त आरक्षण नाही तर इतरही समस्या आहेत केवळ जाती धर्माच्या नावाखाली ते सर्व सहन करतात. नाहीतर भोसले घराण्यातील प्रतिष्ठित व्यक्तींना मंदीराच्या गाभाऱ्यात जाऊ दिले जात नाही, शिवरायांच्या नावाखाली विषमता व द्वेष पसरवला जातो, मंदीरामध्ये दान टाकु शकतात परंतु त्या दानाचा वापर गरीब मराठा समजातील मुलांना शिक्षण, रोजगार यासाठी खर्च करता येत नाही. मराठा समाजातील तरुण किती ही शिकला तरी ही त्याला पुजारी होता येत नाही. याचा विचार सुद्धा मराठा समाजाने करणे आवश्यक आहे. तरच सर्वांगीण विकास होऊन सत्ता हाती येईल. विदर्भामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सांगण्यावरून मराठा समजाने कुणबी लिहायला सुरुवात केली म्हणून म्हणून विदर्भातील मराठा समाजाला ओबिसी प्रवर्गातून आरक्षण मिळते. हाच निकष सरकारने लाऊन मराठा समाजाचा समावेश ओबिसी मध्ये केला आणि ओबिसीची जातीनिहाय जनगणना केली तरच आरक्षणाचा फायदा होईल. नाही तर हा केवळ निवडणूक मुद्दा राहील. जातीनिहाय जनगणना करण्यासाठी केंद्राचा नकार आहे. यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात आंदोलन उभे राहणे आवश्यक आहे. तरच मजबूत आरक्षण मिळेल.

# शिक्षक दिन !




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील.**

आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२



पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# बदलत्या काळात पत्रकारांचे प्रश्न अधिक जटिल : वसंत मुंडे

## पाचोऱ्यात मराठी पत्रकार संघाचे अधिवेशन थाटात

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** बदलत्या पत्रकारितेच्या काळात पत्रकारांची प्रश्न अधिक जटिल होताना दिसत आहेत, पत्रकार हा समाजातील चांगुलपणावर नजर ठेऊन त्रुटी दाखविण्याचेही काम करत असतो. त्याकडे राजकीय धुरिणांनी सकारात्मक पहाण्याची गरज आहे, असे स्पष्ट मत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे पाचोरा ( जिल्हा जळगाव) येथे व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या पाचोरा शाखेच्या वतीने रविवार ३ सप्टेंबर रोजी पत्रकारांना मोफत छत्री, रेनकोट आणि विमा कवच वितरीत करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मुंडे बोलत होते. दरम्यान, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे आगामी अधिवेशन जळगाव जिल्हयातील जामनेर येथे घेण्यात यावे, असा ठराव मांडण्यात आला.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या अधिवेशनाला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मदत, पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, आमदार किशोर पाटील, प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबा श्रीहरी देशमाने, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रविण सपकाळे,विभागीय अध्यक्ष किशोर रायसाकडा, उपाध्यक्ष प्रमोद सोनवणे, जिल्हा अध्यक्ष शरद कुळकर्णी, नगराज पाटील, बीड जिल्हा उपाध्यक्ष भगिरथ तोडकरी, पाचोराचे पोलीस उपअधीक्षक धनंजय वेरुळे, पोलिस निरीक्षक राहुल खताळ, राजेंद्र पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र वाघमारे,योगेश गणगे, उद्योग प्रदीप पाटील, मनोज पाटील, बाजार समितीचे सभापती, गणेश पाटील, युवा नेते सुमित पाटील, किशोर बारावकर प्रविण ब्राम्हणे उपस्थित होते,

पाचोरा येथील भडगाव रोडवरील शक्ती धाम मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना मंत्री अनिल पाटील म्हणाले, पत्रकार हा कोणत्याही प्रकारची वेळ काळ न पाहता आपल्या कुटुंबाच्या सुख दुःखाची तमा न बाळगता प्रतिकूल परिस्थितीत बातमीचे संकलन करुन समाजाला आरसा दाखविण्याचे काम करीत असतो, यामुळे समाजाने आणि राज्यकर्त्यांनी त्यांचविषयी आपुलकीची भावना ठेवली पाहिजे. राज्यकर्त्यांना कुणाला हिरो तर कुणाला झिरो करण्याचे काम ही पत्रकारच करतो.माझ्यावर अनेक वर्ष राजकीय गंडांतर होत असताना माझे पुनर्वसन करण्याचे काम स्थानिक पत्रकारांनी केले आहे, अशी स्पष्ट कबुली पाटील यांनी दिली.

पुढे बोलताना मंत्री अनिल पाटील म्हणाले, समाजाला घडविण्याचे काम पत्रकार करीत असून एखादा विषय हाताळताना त्याला खूप अडचणी येत असतात स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करावे लागते. यामुळे राज्य शासनाने त्यांच्या व्यथा समजून घेतल्या पाहिजेत. अनेक वर्षे पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना पेंशन मिळण्यासाठी सरकारने जाचक अटी व नियम शिथिल केल्या पाहिजेत, यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जालना येथील लाठीचार्ज घटनेचा निषेध व्यक्त करत याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. यावेळी आमदार किशोर पाटील यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक केले. पत्रकारांनी समाजात चांगल्या घडणाऱ्या घटनांना प्राध्यान्य दिले पाहिजे, अशी अपेक्षा आमदार किशोर पाटील यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक प्रविण सपकाळे सुत्रसंचलन महेश कोंडिण्य व शांताराम चौधरी तर आभार किशोर रायसाकडा यांनी मानले.

**यांचा झाला गौरव :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे उपस्थित पत्रकारांना तीन लाख रुपये विम्याचे कवच, रेनकोट व छत्रींचे वाटप करण्यात आले, यावेळी राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार विनायक दिवटे, व महेश कौडीण्य,उत्कृष्ट बांधकाम व्यावसायिक मनोज शांताराम पाटील, वैद्यकीय सेवा दुत डॉ मुकुंद सावनेरकर, उद्योग रत्न भोजराज पुन्सी,कृषी वैभव रत्न तालुका कृषी अधिकारी रमेश जाधव, आदर्श व्यवसायिक लक्ष्मण पुर्सणानी,किराणा व्यवसायातील विनोद ललवाणी, आदर्श सरपंच योगेश कौतीक पाटील,( शेवाळे ) रेखाताई नंदू पाटील ( वाडी )यांना पुरस्काराने गौरविण्यात आले .

# शहरात राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई ; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील नांदेड लातूर रोडवरील सुभाष मटन हॉटेल व एका ढाब्यावर २९ ऑगस्ट च्या रात्री उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करत सहा जणांना ताब्यात घेत त्यांच्या विरुद्ध दारु बंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
लोहा शहर हे राष्ट्रीय महामार्गावर असून वरचेवर वाढत असल्याने या ठिकाणी दिवसभर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. दक्षिण भारताला जोडणारा हा प्रमुख रस्ता मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते त्यामुळे या शहराच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात ढाबे, मटन हॉटेल, खानावळी आहेत आणि या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विनापरवाना देशी व विदेशी दारू विक्री आणि तेथेच प्राशन करत असल्याचे गुप्त माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली त्या आधारे २९ ऑगस्ट च्या मध्यरात्री उत्पादन शुल्क विभागाच्या उपायुक्त उषा वर्मा अधीक्षक अतुल कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्पादन शुल्क निरीक्षक आशिष महिंद्रकर उपनिरीक्षक राजकिरण सोनवणे, सहाय्यक उपनिरीक्षक शिवाजी कोरनुळे, महिला जवान शिल्पा कांबळे, जवान संतोष संगेवार, जवान श्रीनिवास वजीराबादे यांनी सुभाष मटन हॉटेल, पालम रोडवरील एका ढाब्यावर कारवाई करत त्या ठिकाणी सहाजण विनापरवाना देशी विदेशी दारू पित असल्याचे आढळून आले त्यांना ताब्यात घेऊन त्याचाही जणांविरुद्ध दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्यांना लोहा न्यायालयात हजर केले असता त्यांना एक हजार रुपये त्यांना दंड ठोठावण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसापासून सुप्त अवस्थेत असलेले राज्य उत्पादन शुल्क अचानक ॲक्शन मोडवर आल्याने शहरातील विनापरवाना दारू विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. अनेक सुज्ञ नागरिकांनी या कारवाईचे जणू स्वागतच केले आहे.राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या या अतुलनीय कामगिरीमुळे शहर व परिसरातील जे ढाबे, हॉटेल, बार, दारू दुकाने यांना अशाच प्रकारे त्यांनी शिस्त लावण्याची आवश्यकता आहे.

लोहा शहरातील एकमेव जय मल्हार वाईन मार्ट आहे त्याच परिसरात लोक ठिकाणी दारू खरेदी करून मागच्या बाजूने प्राशन करीत असतात. त्याचा त्रास जवळच असलेल्या नगरातील असलेल्या लोकांना होतो आहे. याकडे देखील त्यांनी लक्ष देऊन तसेच राजाराम नगर समोर इंगळे यांच्या पेट्रोल पंप परिसराच्या बाजूला असलेल्या दारू दुकानला शिस्त लावावी. येथून परिसरातील अवैध दारू स्कूटी,आटो, चारचाकी तून खेड्यापाड्यात नेत वाहतूक होत असलेल्या वर तात्काळ आळा घालावा अशी मागणीही होत आहे.

# पुरस्कारांची घोषणा; १०८ शिक्षक मानकरी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शालेय शिक्षण विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यानुसार राज्यातील विविध विभागांतील १०८ शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले असून, शिक्षक दिनी पुरस्कार प्रदान कार्यक्रम मुंबईत होणार आहे. शिक्षक पुरस्कारांची घोषणा शिक्षण विभागाने शासन निर्णयाद्वारे शुक्रवारी केली. शिक्षण क्षेत्रात निष्ठेने काम करणाऱ्या शिक्षकांचा गौरव पुरस्काराच्या रुपात १९६२-६३पासून करण्यात येतो. या पुरस्कारांसाठी राज्य समितीची बैठक २५ ऑगस्टला झाली. त्यानंतर विभागनिहाय निवडयादी शिक्षण विभागाला सादर करण्यात आली.





# श्रावणी सोमवारनिमित्त ब्रह्मगिरी प्रदक्षिणेला गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** श्रावणातील सोमवारनिमित्त बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या श्री त्र्यंबकेश्वर मंदिरात एकिकडे दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली असताना ब्रम्हगिरी प्रदक्षिणेसाठीही भाविक येत आहेत. मोठ्या प्रमाणावर भाविकांनी रविवारी रात्रीच प्रदक्षिणेला सुरुवात करुन सोमवारी सकाळी ती पूर्ण केली. तर अनेक भाविक सोमवारी दिवसा प्रदक्षिणेसाठी त्र्यंबकमध्ये आले आहेत.त्र्यंबकेश्वर येथे पहिल्या दोन श्रावण सोमवारी अपेक्षित गर्दी होऊ शकली नाही. परंतु, तिसऱ्या श्रावणी सोमवारी भाविकांची चांगलीच गर्दी झाली आहे. त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या वतीने व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र Business Katta









# निष्काम कर्मयोगी : डॉ.व्यंकटेश काब्दे



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन I मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ आपल्याला आपले कर्म करण्याचा अधिकार आहे परंतु त्याच्या फळाच्या अपेक्षेचा अधिकार नाही. म्हणून सतत क्रियाशील राहून कसलीही अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे केले काम हे माणसाला माणूस बनविण्यास सार्थ ठरू शकते. हाच श्रीकृष्णोपदेश डॉ. व्यंकटेश काब्दे सरांबाबत तंतोतंत खरा ठरतो. एका साधारन कुटूंबात जन्म घेऊन प्रतिकूलतेला अनुकूल करत अशा संघर्षदायी प्रवासात नुसतेच एक डॉक्टर नव्हे तर निष्णात हृदयरोग तज्ज्ञ, खासदार, समाजसेवक, साहित्यिक अशा सर्वच क्षेत्रात वयाच्या ८३ व्या वर्षातही तरुणाईला लाजवेल अशी निष्कलंक, निस्वार्थ व प्रामाणिकपणे सेवा करणारे पितृतूल्य व्यक्तिमत्त्व डॉ. व्यंकटेश काब्दे सरांचा ४ सप्टेंबर हा जन्मदिवस त्या निमित्ताने त्यांनी वयाची शंभरावी गाठावी अशी अपेक्षा बाळगणारे असंख्य चाहते व माझ्यावतीने त्यांना कृतज्ञतापूर्वक आदराचा लाल सलाम.**

नांदेड एज्यूकेशन सोसायटीच्या माध्यमातून शिक्षणक्षेत्रात गोर-गरिब, वंचित, अपेक्षित-उपेक्षित विद्यार्थ्यांसाठी चालू असलेले त्यांचे कार्य लाख मोलाचे आहे. सर्वधर्मसमभाव हे शब्द उराशी बाळगून कायम रुग्णसेवेसह समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात विकासात्मक प्रक्रिया नेटाने पुढे नेऊन समाज हित साधले पाहिजे हाच एकमेव ध्यास त्यांच्या मनी कायम असतो. एक शिलवंत, बुद्धिवंत, प्रामाणिक लोकप्रतिनिधी म्हणून ते राजकारणापासून दूर असतात. वर्तमान राजकारण व राजकारणी लोकांबद्दल त्यांच्या मनी फारसे आपले पण नसते. एक सृजनशील मनाचा माणूस म्हणून सर्वच क्षेत्रातील लोक त्यांच्याकडे आदराने पहातात. असे बहूआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून मला कधी कधी वाटते की, माणसातला माणूस म्हणून जगण्याचे खरे भाग्य डॉ.काब्दे सरांनाच लाभले आहे. माणूस, माणूस म्हणून जगला पाहिजे व त्याला समाजानेही माणूस म्हणूनच जगविले पाहिजे ही संकल्पना त्यांच्या हृदयी नेहमीच असते. आयुष्याची सुरुवात प्रामाणिक रुगणसेवेने करून लोकप्रतिनिधी, जनसेवक, समाजसेवक, शिक्षणसेवक, साहित्यिक अशा अनेक संवेदनशील विशेषणाने भारलेले हे व्यक्तीमत्त्व तुम्हा आम्हासाठी नुसतेच प्रेरणादायी नव्हेतर एक जगण्याचा मार्ग दाखविणारे बहुमूल्य असे उर्जास्त्रोत आहे.

अशा प्रेरणादायी उर्जास्त्रोताने एक स्वाभिमानी, प्रामाणिक, आदर्श व देशाभीमानी समाज घडविणारे चिरंजीवी विद्यापीठ म्हणजेच डॉ.व्यंकटेश काब्दे सर.


प्रामाणिक व्यक्ती व समाजविकास सेवा ही त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण करणारे मुख्यपैलू असल्यामूळे कैक वर्षापासून मी त्यांच्या सान्निध्यात आलो. माणसाला



माणून म्हणून जगणे व जगविणे हा मूलमंत्र माझ्यासह सर्वांसाठी निश्चितच उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. आपल्या प्रामाणिक कर्मावर कायम निष्ठा ठेऊन जगणे ही साधीसूधी बाब नाही. म्हणूनच डॉ.काब्दे सरांना चिरंजीवी व शतायुषी हो...! म्हणणे वावगे नसावे. अशा कर्मनिष्ठ व निष्काम कर्मयोग्याला वयाची ८३ वर्षे पार करत असल्यामूळे त्यांनी वयाची शंभरावी गाठावी यासाठी आदरयुक्त अपेक्षा असणे स्वाभाविक आहे.

**जिंदगी जिना आसान नही होता ।**
**बिना संघर्ष कोई महान नही होता ।**
**जबतक ना पडे हातोडी की चोंट ।**
**तबतक पत्थर भी भगवान नही होता ।।**
**जय हिन्द ।इन्कलाब जिंदाबाद ।लाल सलाम**

# शिक्षक 'दीन'



दत्ता तरलगट्टी सर
मुक्त पत्रकार

आधुनिक केसरी

**शिक्षक दिन दरवर्षी साजरा केला जातो. प्रथम राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवस हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी आपण आपल्या शिक्षका ,गुरु प्रति आदर व्यक्त करुन, त्यांना ते जिथे असतील तिथे जाऊन त्यांना वंदन करून ही, हा दिवस साजरा केला जातो.अनेक शाळांमधून शिक्षक दिनी विविध कार्यक्रम आयोजित करून हा दिवस साजरा करतात. अनेक शिक्षकांना विविध संस्थांचे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शासकीय पुरस्कार ही दिले जातात. अनेक सामाजिक संस्था सुध्दा शिक्षकांचा सन्मान करतात. एक गोष्ट इथे आवर्जून देऊ ईच्छितो ती म्हणजे डॉ शंकरदयाल शर्मा हे राष्ट्रपती असताना एका देशात शासकीय भेटी दरम्यान तिथल्या राष्ट्राध्यक्षाने स्वतः त्यांना विमानतळावर घेण्यासाठी गेले होते.**

त्यांनीच त्या गाडीचे सारथ्य केले होते. त्याचे कारण त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की मी भारतात जेव्हा शिक्षण घेतले होते तेव्हा ते डॉ शंकरदयाल शर्मा यांचे शिष्य होते. हा आणि असा सन्मान फक्त आणि फक्त शिक्षकांच्याच वाट्याला येतो.म्हणून निष्ठावंत, निस्वार्थी, निगर्वी, निष्णात, प्रामाणिक, सर्वगुणसंपन्न शिक्षक असण महत्त्वाचे आहे. अशा सर्व शिक्षक बंधू भगिनींना माझ्या तर्फे विनम्र अभिवादन आणि शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.....!! आज काल शिक्षका प्रति एवढी कृतज्ञता पहायला मिळत नाही. याला कोण जबाबदार आहे याचे आत्मपरीक्षण करायला हवं. चांगल्या आणि ध्येयवादी शिक्षकांना शिक्षणक्षेत्रात चाललेल्या वाईट गोष्टींचा खेद वाटतो आहे. अनेकदा, "शिक्षकांना फक्त शिकवू द्या"असं अनेक शैक्षणिक विचारवंतांनी ह्यावर विस्तृत लिहिलेले वाचले आहे.पण अनेक शालाबाह्य कामे त्यांना दिली जातात. शालेय व्यवस्थापन शाळा महत्त्वाची आहे. पूर्ण शाळा करा आणि मग ते काम करा हा होरा असतो. मुख्याध्यापक पण त्यांना समजून घेत नसतात. ते त्यावेळी सोईस्कररित्या हे विसरतात की आपण ही कधी काळी शिक्षक होतो तेव्हा सुट्टी मागण्यात आपण अग्रेसर होतो.

माध्यमिक पेक्षा प्राथमिक शिक्षकांची अवस्था त्याहून वाईट. लहान मुलांना सांभाळून, योग्य शिक्षण देऊन, इतर कामे करावी लागतात. मुख्याध्यापक, संस्था, शासन तिनतिन आघाड्यांवर लढावे लागते. वेगवेगळे सर्वेक्षणाची कामे दरवर्षी येतातच.त्या केलेल्या सर्वेक्षणाच पुढे काय होतं कुणास ठाऊक. कदाचित शिक्षक प्रामाणिक असतो म्हणून त्यांच्या कडेच ही कामं शासन सोपवित असावे. इतर नोकरदारांवर शासनाचा विश्वास नाही अशी शंका येते. शिक्षक हा अनेक वर्षे सेवेत राहून पदोन्नती प्राप्त करतो. शिक्षक होण्या पासून निवृत्त होई पर्यंत सर्व ठिकाणी चिरीमिरी देत राहतो. ( अनेक शिक्षणाधिकारी यांच्या वरती खटले चालू आहेत म्हणून वाटते)

शाळा हे ज्ञानदानाचे पवित्र ठिकाण आहे. त्याचे पावित्र्य जपणं हे प्रत्येक शिक्षकाचे काम आहे. शाळा हे एक टिमवर्क आहे. कोणी एकामुळे शाळा चालत नसते. मी सांगतो तसेच व्हायला पाहिजे असा अट्टाहास काही मुख्याध्यापक करतात. एखाद्या शिक्षकाने रजा मागितली तर मुद्दाम नाकारायची. महिन्याची मागितली तर पंधरा दिवसांची मंजूर करायची. रजा शिल्लक असताना रजा न देण कितपत योग्य आहे? हल्ली पूर्वीप्रमाणे एक महिना तीन महिने रजा एखाद्याने काढली तर बदली शिक्षक नेमला जात असे. शासन रजा काळातील शिक्षकास पगार देत असे. आता तर ते जवळपास बंदच झालं आहे असे वाटते. मुला मुलीची लग्न, बाळंतपण, यासाठी महिन्याची रजा पाहिजे म्हंटलं की आता जो शिक्षक रजा काळात येतो आहे त्याला तीन हजार दोन हजार रजा काढणाऱ्या शिक्षकानेच द्यायचे. शिवाय रजा खर्चीपण टाकायची हा कुठला न्याय? पदोन्नती मिळालेले लोक हल्ली कसही वागतात. आपण आपल्या सहकारी शिक्षकांना विश्वासात घेऊन काम करावं हे त्यांच्या गावीही नसतं. पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक, ही पदं आज आहेत. पण उद्या निवृत्त झाल्यानंतर माणूस म्हणून वावरताना हे लोक मग समोरून गेले तर ओळख ही देत नाहीत. तेच सर्व शिक्षकांना सन्मानाने, समानतेने, सहकार्याने, वागवले तर ते लोक अशा साहेबांना कुठे ठेऊ कुठे नाही असे करतात. सेवानिवृत्ती नंतर ही योग्य तो आदर दाखवतात. मुख्याध्यापक असला तरी त्याच्या अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेले शिक्षक असतात. त्यांच्या पेक्षा वयाने अधिक



शिक्षक असतात, त्यांनी त्यांना कमी लेखू नये. त्यांना त्यांच्या पात्रते प्रमाणे मोठे चांगले वर्ग अध्यापनासाठी दिलेच पाहिजेत. शिक्षक आणि साहेब यांच्यातील मागील काही कारणांनी आलेल वितुष्ट डोक्यात ठेवून आता ह्याची जीरवायची मला संधी मिळाली आहे. आता जिरवतोच असं जर का साहेबांनी मनात अढी ठेवली तर नुकसान दोघांचे होत नाही. मुलांचे आणि शाळेचे होते. एम्.एस्.सी.बी.एड्. असणाऱ्यास दहावी बारावीचेच अध्यापन तास देणे अपेक्षित आहे. त्यांना पाचवी ते सातवी अध्यापनाचे तास देऊन काय उपयोग?कदाचित त्या शिक्षका इतके गणित भूमितीचे ज्ञान एखाद्या साहेबास ही नसते पण पूर्वग्रह दुषित असल्याने मुद्दाम कुजवण्याचे प्रकार होतात. काही मुख्याध्यापक शासनाची/ संस्था सदस्यांची भीती घालतात. तस करणे म्हणजे स्वतःलाच ते कमीपणा आणत असतात. धाक स्वतःचा असला पाहिजे,तो ही नैतिक धाक!!!की जो स्वतःच्या प्रामाणिक कर्तव्यातून प्रकट झाला पाहिजे. काही साहेब शिक्षकांचे वाढदिवस, त्याने केलेल्या चांगल्या कामाची दखल योग्य पध्दतीने घेऊन योग्य तो सन्मान करतात. गोडी गुलाबीने प्रत्येकाला वागवून काम साधतात. तर काही साहेब सी.सी.टी.व्ही.चा वापर एखाद्या दुसऱ्या वर वॉंचसाठी करतात. त्याचा वापर केवळ विद्यार्थी सुरक्षितता यासाठी व्हावा.खरं तर मुख्याध्यापक सर्वगुणसंपन्न असेल तर त्याची गरज ही भासत नाही. (तसं तर साहेबांची खास माणसं सी.सी.टी.व्ही.चे च काम करतात.) गड्याचा गवंडी झालेल्या माणसाला हे कसं कळणार?

परवा एक सोशल मिडिया वर पोस्ट वाचनात आली. "आज काल शाळेत भीतीय, दहशतीचे वातावरण असल्याचे जाणवते आहे. कदाचित तुमचे मत असे असेल की दुसरे?" ही पोस्ट शिक्षकांच्या अंतर्मनात काय चाललय ह्याची जाणीव करुन देणारी भावनिक पोस्ट मनाला स्पर्शून गेली. म्हणजेच आजकालचे शालेय वातावरण शिक्षकांना मुक्तपणे अध्यापन करण्यास योग्य नाही असेच त्या पोस्ट वरुन वाटते आहे. म्हणूनच लेखास शीर्षक देताना "दिन" ऐवजी "दीन" असं म्हणालो आहे. शैक्षणिक वातावरण हे आनंददायी असावं."आनंददायी शिक्षण" हे केवळ पाठ्यपुस्तकाच्या मुखपृष्ठावर किंवा शाळेच्या भिंतीवर शोभून दिसण्यासाठी नाही. ते प्रत्यक्षात तिथे उतरले पाहिजे. यासाठी शिक्षकावर कोणतेही दडपण नको आहे. त्यांना लेखी देण, काही त्यांच्याकडून लिहून घेणं, मुद्दाम एखाद्याचे तास पहाणी करणं, वार्षिक मुल्यमापन योग्य न करणं, जासूसा करवी वॉंच ठेवण, शैक्षणिक अर्हते प्रमाणे तास न देण, रजा टाळणं, टाचण वह्याची सक्ती करणं, जवळच्याना सूट देण,अशा गोष्टी करण टाळलं तरच वातावरण आनंददायी ठरेल. प्रसन्न, चैतन्यदायी, निरागस विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या अध्यापकाचे ही चेहरे तितकेच प्रसन्न चैतन्यदायी, ठेवण्याच काम प्रशासनाचे आहे. ते त्यांनी केल तर शाळा हे मंदिर ठरेल. शाळेचा, शिक्षक शिक्षिकांच्या अंतर्मनातील अंतर्नाद सर्व ज्येष्ठ, श्रेष्ठांनी ओळखायला हवा. ऐवढेच..!!!

# जीवन घडविणारे शिल्पकार, वंदनीय व्यक्तिमत्त्व गुरुजी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनाची दशा आणि दिशा बदलण्याची ताकद शक्ति सामर्थ्य असणारी अद्भुत दिव्य शक्ती म्हणजे गुरुजी. आपण आपल्या जीवनात केलेली प्रगती अथवा अधोगती याच्या पाठिमागे आपल्या जीवनात वेगवेगळ्या टप्प्यांवरील गुरूजन यांचा शुभ आशिर्वाद असतो. विद्या हे सर्व श्रेष्ठ असं धन आहे. ते एकदा प्राप्त झालं तर आयुष्यच सोनं झाल्याशिवाय राहत नाही.**

सर्वश्रेष्ठ असणार विद्या हे धन अहोरात्र निस्वार्थी भावनेने दान करण्याच महत भाग्य ज्यांना लाभल असे महान विभूती संस्कारांचे अंखड वाहक निस्वार्थी ,निःसंदिग्ध अहेतुक , प्रामाणिक भावनेने व सचोटीने लोककल्याणासाठी जीवन समर्पित करण्याचे महत भाग्य ज्यांच्या वाट्याला येत ते महान थोर आदर्श वंदनीय पुजनीय गुरूजन असतात . लोककल्याणासाठी जीवन समर्पित करणारे युगो युगे अनेक पिढ्या घडविण्यासाठी अहोरात्र योगदान देताना कोणताही संकुचित भाव वृत्ती न बाळगता उदार अंतःकरणाने सदैव सात्विक ज्ञान दान करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सगळ्या प्रकारच्या चांगल्या उत्तम ,सदाचारी, सात्विक ,शिस्ती लावण्याचे महत्वपूर्ण कार्य करण्याच महत भाग्य गुरूजी यांच्या वाट्याला येत .आपल्या जीवनातील यशाचे खरे शिल्पकार सुद्धा आपले गुरूजनच असतात . आपल्या मध्ये असणारी कुवत, क्षमता तपासून योग्य आकार देण्याच महत्वपूर्ण कार्य सुद्धा गुरूजनच करत असतात .न्याय,निती, धर्म मार्ग अवलंबून सदमार्गने मार्गक्रमण करून यशाल गवसनी घालण्याची प्रेरणा हा गुरुजनांचा कृपा प्रसाद असतो .आपलं आयुष्य आणि भविष्या घडविण्या मध्ये गुरुजनांचा कळत न कळत सिंहाचा वाटा असतो. अगदी जन्म झाल्यानंतर बालपणी लहान वयात आई प्रथम गुरूजी असते .नंतर वेळेनुसार प्राथमिक शिक्षण ते माध्यमिक उच्च शिक्षण या दरम्यानच्या कालावधीत अनेक वेगवेगळ्या गुरूजींच्या सानिध्यात प्रभावाने आपण घडत असतो . मग क्षेत्र कोणतही असु द्या गुरूजींना शिवाय यश नाही.आपल्याला ज्या क्षेत्रात झेप घेयची आहे .त्या क्षेत्रातील गुरूजी यांचा आपल्याला घडविण्यासाठी व आपल्या यशात सिंहाचा वाटा असतो. जीवनाची दिशा हि आपल्याला वेळोवेळी उपलब्ध होणार मार्गदर्शन,आपला सहवास, आजुबाजुला असणार वातावरण, आणि आपण ज्यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गक्रमण करत आहेत.ते गुरूजन या सगळ्या बाबींवर अवलंबून असते.महणुन गुरूजनांच योग्य मार्गदर्शन हे खूप महत्वपूर्ण असत . गुरूजनांन शिवाय कोणीही व्यक्ती हा परिपूर्ण होऊ शकत .नौकरी शिक्षण इथपर्यंतच गुरूजणांच महत्व अबाधित नसुन अमर्याद जीवनाच्या प्रत्येक वळणावर आपल्याला गुरूजनांची आवश्यकता जाणवते.तसेच आपल्याला सदाचारी सात्विक घडवून एक चांगल आदर्श व्यक्तिमत्व घडविण्या मध्ये सुद्धा गुरूजनांचा सिंहाचा वाटा असतो .इतिहासा चे अवलोकन केले तर सर्व थोर सदपुरूष , महापुरुष हे गुरूजनांच्या सानिध्यात घडले.अगदी सृष्टी वर त्रेतायुगात अवतार घेतलेले प्रभु श्रीराम असतील किंवा द्वापारयुगात अवातार घेणारे भगवान श्रीकृष्ण असतील शिक्षण हे गुरूंच्या सानिध्यात अज्ञाधारक होऊन च घेतले . देव देवतांना देखिल गुरूजनांच्या सानिध्यात शिक्षण घ्यावं लागल .म्हणजे आपल्या संस्कृतीत गुरजनांच महत्व किती अफाट आहे यावरून आपल्या लक्षात येईलच. आपल्याला देशाला शिक्षणाचा व गुरू शिष्य परंपरेचा खुप मोठा वसा वारसा लाभलेला आहे .हे आपलं भाग्य आहे. आणि हि परंपरा हा वारसा हे संस्कारा पुढे चालण्यासाठी गुरूजन ज्या पद्धतीने अहेतुक योगदान देत आहेत. उल्लेखनीय कामगिरी करत आहेत .हे ऋण फेडण्यासाठी शब्द अपुरे पडतील तरी ते ऋण फिटणार नाही. गुरुजनांचा आद ही परंपरा तर भारत देशाला ब्रह्मांड नायक भगवान विष्णू यांचे सातवे अवतार प्रभु श्रीराम यांनी जगातील सगळ्यात मोठ्या राज्याचे राजकुमार असताना देखिल विश्वामित्र ऋषी यांच्या आश्रामात जाऊन तेथे सर्व सामान्य व्यक्ती प्रमाणे गावताच्या चटाईवर आराम करून फळ कंद मुळ हा आहार घेऊन शिक्षण पुर्ण केले.

# सोनियाचा दिवस आजि अमृते पाहिला



सौ. शुभांगी हे. पांगरकर
श्री स.भु.प्रशाला, छत्रपती संभाजीनगर

आधुनिक केसरी

**आकाशात पाखराप्रमाणे उडू शकता,समुद्रात माशाप्रमाणे खोलवर वावरू शकता हे तर मला माहीतच आहे पण पृथ्वीवरच माणसाप्रमाणे वागणे तुम्ही अजून शिकला आहात काय? ते शिकण्यासाठी तुम्हाला भारतीय संस्कृत विद्या मार्गदर्शन करू शकेल. एका भारतीय तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीचे माहात्म्य सांगताना उदगारलेले वाक्य आहे. ते तत्त्वज्ञ दुसरे तिसरे कोणी नसून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन होते. स्वामी विवेकानंदानंतर सर्व जगात भारतीय तत्त्वज्ञानाचा संदेश पोहोचविण्याचे फार महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेला त्यांच्यासारखा गाढा पंडित मिळणे केवळ अशक्य होय.**

**असा हा जीवनपट** : डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म इसवी सन 1988 मध्ये मद्रास प्रांतातील तिरुत्तानी तीर्थक्षेत्री झाला. तिरुत्तानी पासून तिरुपती हे देवस्थान आहे; अशा मंगलमय वातावरणात त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील तहसीलदार होते घरातील धार्मिक वातावरणाचा प्रभाव त्यांच्या विचार, वाचनावर पडला. प्राथमिक शिक्षण तिरुत्तानी या गावी झाले. वयाच्या आठव्या वर्षी माध्यमिक शिक्षणासाठी तिरुपती येथील ख्रिश्चन मिशन स्कूल मध्ये प्रवेश घेतला. या शाळेतून इसवी सन 1903 मध्ये मॅट्रिकची परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षणाकरिता त्यांनी व्हूरीज कॉलेजात प्रवेश घेतला. बीए परीक्षा पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकांनी उत्तीर्ण झाले .बीए साठी तत्त्वज्ञान हा विषय त्यांनी योगायोगानेच निवडला ही निवड किती सार्थ होती याचे प्रत्यंतर आपणास आलेच आहे. मद्रास व म्हैसूर येथील विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. म्हैसूरहून ते कलकत्ता येथे पंचम जॉर्ज यांच्या नावाने असलेले मानसिक व नैतिक तत्त्वज्ञानाचे विद्यासन भूषविण्यास गेले. या ठिकाणी वीस वर्षाहून अधिक काळ कलकत्ता विद्यापीठाशी संबंध होता. याच ठिकाणी त्यांच्या बौद्धिक तेजाला एक झालर आली त्यांची ख्याती एक विद्वान प्राध्यापक म्हणून सर्व जगभर आली त्यांना इंग्लंड अमेरिकेतून व्याख्यानासाठी निमंत्रणे येऊ लागली. इसवी सन 1931 ते 1936 या काळात त्यांनी आंध्र विद्यापीठाची उभारणी केली. या ठिकाणी कुलगुरू म्हणून केलेले कार्य उल्लेखनीय आहे बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांनी काम केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटना समितीवर काम करण्याची त्यांना संधी मिळाली.या संधीचेही त्यांनी सोने केले इसवी सन 1952 मध्ये त्यांची भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली. या पदावर ते सन 1962 पर्यंत म्हणजे त्यांची राष्ट्रपती म्हणून निवड होईपर्यंत राहिले असे म्हणतात की काही पदांमुळे माणसाला श्रेष्ठत्व येते तर काही पदांची श्रेष्ठता काही व्यक्तींमुळे वाढते. डॉ राधाकृष्णन यांच्या श्रेष्ठ विचारांमुळे उपराष्ट्रपती व राष्ट्रपती व 1954 मध्ये मिळालेला सर्वोच्च नागरिक भारतरत्न सन्मान पदे सर्वश्रेष्ठ ठरली.डॉक्टर राधाकृष्णन यांना शिक्षणाची संकुचित दृष्टी मान्य नव्हती. शिक्षण हे सर्वसमावेशक असले पाहिजे. माणुस केवळ साक्षर बनला पाहिजे असे नसून साक्षरता हा एक शिक्षणाचा लहानसा परिणाम आहे. शिक्षणातून व्यक्तीचे मन बुद्धी व आत्मा यांच्या विकासाची बीजे आहेत. शिक्षणाने मन परिपक्व झाले पाहिजे. बुद्धी विकसित झाली पाहिजे व आत्म्याला स्वतःचे स्वरूप कळले पाहिजे. डॉ राधाकृष्णन यांचे विचार



पाहता त्यात धार्मिक शिक्षण,कार्यवाद आंतरराष्ट्रीय सामंजस्य, धर्म आणि विज्ञान या सर्वांचा सुरेख मिलाफ झालेला आहे. याचा प्रत्येक प्रकाशाने अंधःकारावर, ज्ञानाने अज्ञानावर हळूहळू विजय मिळवणे म्हणजे शिक्षण. 'तमसो मा ज्योतिर्गमय' असे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असेच त्यांना सांगावयाचे होते. शिक्षकांबद्दल परकाष्ठेचे प्रेम व्यक्त करणारे डॉक्टर राधाकृष्णन आपल्या जन्मदिनी शिक्षकांचा सन्मान व्हावा या उद्देशाने शिक्षक दिन साजरा करण्याची इच्छा व्यक्त करतात. सर्व भारतभर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा होऊ लागला. शिक्षकांनी तेजस्वी राष्ट्र निर्माण करण्यासाठी स्वतःच्या कष्टाने प्रयत्नाने आपली पात्रता सिद्ध केली पाहिजे. शिक्षकाजवळ व्यवसायनिष्ठा अदययावत ज्ञान. विद्यार्थ्यांबद्दल प्रेम त्यांच्या विकासाची तळमळ तर निश्चितच समाज त्यांचा आदर करेल. गुरुजनी ऐसे द्यावे धडे, आपला आदर्श ठेवून पुढे। विद्यार्थी तयार चहूकडे। राष्ट्र होई तेजस्वी।। असे जीवन आणि शिक्षण साधावे गठबंधन प्रथमपासूनचि सर्वांगीण। शिक्षण द्यावे तारतम्ये।। प्राचीन काळापासून शिक्षकाला आदराचे स्थान आहे. गुरु म्हणजे साक्षात परमेश्वर अशी श्रद्धा प्रत्येकाच्या मनात होती परंतु दिवसेंदिवस ही भावना, श्रद्धा बदलत आहे कारण काळाच्या ओघात शिक्षण व्यवस्थेतही बदल झालेला आहे. शिक्षणाचा भर गुणांवर दिला जाऊ लागला व ज्ञानसाधना हा विचार मागे पडला. बालकांचा विकास साधण्यापेक्षा परीक्षेत जास्तीत जास्त यश कसे मिळवता येईल याला महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षकांवरही अशैक्षणिक कामांचा बोजा वाढला आहे.हे वातावरण समाजातून दूर करण्यासाठी शिक्षकांनी मी एक शिक्षक आहे हे स्वाभिमानाने सांगावे व त्याप्रमाणे स्वाभिमानाने काम करावे. निर्भय शिक्षक चांगले विद्यार्थी निर्माण करू शकतात. नवीन विचारांचा प्रसार शिक्षकाशिवाय दुसरा कोण करू शकेल? जो सतत प्रगतीपथावर असतो तोच त्यांचा आदर्श बनतो. अशा आदर्श गुरुजींविषयी मुलांच्या मनात गुरुगोविंद दोऊ खडे, काके लागो पाय ?
बलिहारी गुरु आपकी गोविंद दियो बताय।।
या संत तुलसीदास यांनी लिहिल्याप्रमाणे गुरु व गोविंद एकाच वेळी समोर आले तर प्रथम गुरूला वंदन केले पाहिजे. त्या गुरुजींनीच हे भगवंताचे स्वरूप दाखविले. भगवंतापेक्षाही गुरु श्रेष्ठ आहे ही भावना निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. डॉ. राधाकृष्णन यांच्यासारख्या आदर्श शिक्षकांच्या जन्मदिनी आपण आपली जबाबदारी पेलण्यास सज्ज होऊया!!! कारण जेथे गती आहे प्रगती आहे तेथे शिक्षक आहे. एक शिक्षक म्हणून आज हेच नमूद करावेसे वाटते.

# शिक्षण, शिक्षक आणि समाज: एक सिंहावलोकन



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**सप्टेंबर महिना शिक्षकांसाठी खूप महत्त्वाचा आहे व तितकाच खास आहे . कारण दरवर्षी भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन म्हणजेच ५ सप्टेंबर हा 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो जो १९६२ पासून सुरू झाला . जगातील विविध देशांमध्ये शिक्षक दिन वेगवेगळ्या तारखांना साजरा केला जातो. १९९४ पासून, आंतरराष्ट्रीय स्तरावर ५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. १९६६ च्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटना/युनेस्कोने शिक्षकांच्या स्थितीवर केलेल्या शिफारसी स्वीकारल्याच्या वर्धापन दिनानिमित्त हा दिवस साजरा केला जातो.कोणत्याही समाजाच्या जडणघडणीत शिक्षकाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते, कारण चाणक्याने स्पष्टपणे म्हटले आहे की, "शिक्षक कधीच सामान्य नसतो.**

समाजातील शिक्षकाचे महत्त्व अधोरेखित करताना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी लिहिले आहे की, “समाजात शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. हे बौद्धिक परंपरा आणि तांत्रिक कौशल्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रसारित करण्याचे केंद्र आहे आणि सभ्यतेची ज्योत तेवत ठेवण्यास मदत करते.” कोठारी आयोगानेही शिक्षकांना 'राष्ट्रनिर्माते' ही संज्ञा दिली आहे.

कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास हा त्या देशाच्या शिक्षणावर अवलंबून असतो, त्यामुळे आज आपल्यासमोर अनेक प्रश्न आहेत की आपल्या समाजाला अनुकूल अशी शिक्षणपद्धती कोणती असावी? बदलत्या वातावरणात शिक्षकाची भूमिका काय आहे? विविधता आणि विषमता असलेल्या भारतीय समाजात शिक्षण व्यवस्था सर्वसमावेशक कशी बनवायची? भारतीय समाज आणि शिक्षण- भारतीय समाजात विविधता आहे, म्हणून भारतीय समाज आणि संस्कृती समजून घेण्यासाठी अंतर्दृष्टी आवश्यक आहे. भारताचा शैक्षणिक इतिहास जाणून घेण्यासाठी त्याचा सांस्कृतिक प्रवाह समजून घेणे आवश्यक आहे कारण शिक्षण आणि समाज यांचे चिरंतन नाते आहे. धर्म, तत्त्वज्ञान आणि शिक्षण हे भारतीय समाजाचा आधार सभ्यतेच्या सुरुवातीपासूनच राहिले आहेत. वैदिक काळापासून भारत शैक्षणिकदृष्ट्या संपन्न आहे. वेदांमध्ये शिक्षकांचे गुण आणि कर्तव्ये, शिष्याचे गुण आणि कर्तव्ये, शिक्षक आणि शिष्य यांच्यातील संबंध, शिक्षणाची पद्धत, शिकवण्याची पद्धत, शिक्षण सत्र आणि शिक्षण इत्यादी विषयांवर सविस्तर प्रकाश टाकण्यात आला आहे. भारतात वैदिक काळापासून वसाहतपूर्व काळापर्यंत अनौपचारिक शिक्षण व्यवस्था प्रचलित आहे. गुरुकुल आधारित शिक्षण पद्धती हा भारतीय परंपरेचा प्रमुख भाग आहे.

भारतीय शिक्षण व्यवस्थेची समृद्ध परंपरा नालंदा आणि तक्षशिलाच्या स्थापनेवरून आणि तिच्या प्रभावावरून ओळखता येते. बौद्ध आणि जैन धर्माने पारंपारिक भारतीय शिक्षण पद्धती बदलली, परंतु हे स्पष्ट आहे की प्राचीन शिक्षण पद्धती धर्मावर आधारित होती. मदरसा हे मध्ययुगीन भारतीय समाजात शिक्षण देण्याचे मुख्य माध्यम होते.

आपली सध्याची शिक्षण व्यवस्था ब्रिटिश मॉडेलवर आधारित आहे. पुनर्जागरण आणि सुधारणेपासून, ब्रिटिश प्रणाली पश्चिमेकडील व्यक्तिवादी आणि उदारमतवादी मूल्यांशी संबंधित आहे, म्हणून तिची रचना औपचारिक आहे. भारतात औपचारिक शिक्षण पद्धती वसाहतवादाच्या काळात सुरू झाली. भारतातील प्राथमिक ते उच्च शिक्षण संस्था या ब्रिटिश पद्धतीनुसार स्थापन झाल्या. ब्रिटीश काळात विविध आयोगांनी संपूर्ण वसाहती काळात भारतीय शिक्षण व्यवस्थेचा पाया घातला, ज्यात मॅकॉले मिनिट, द वुड डिस्पॅच, सॅडलर कमिशन आणि १९०४ चे भारतीय शैक्षणिक धोरण यांचा समावेश आहे. इंग्रजांच्या काळातील शिक्षण व्यवस्थेची रचना ही ब्रिटिश राजवटीच्या हितासाठी होती. १८३५ मध्ये मॅकॉलेच्या विधानावरून ब्रिटिशांच्या शिक्षण धोरणाचे वसाहतवादी स्वरूप स्पष्ट होते. तो म्हणाला, “आपण आणि ज्यांच्यावर आपण राज्य करतो त्या लाखो लोकांमध्ये उभा राहणारा वर्ग आपण निर्माण केला पाहिजे.

स्वतंत्र भारताने सर्व स्तरांवर शिक्षणात बहुआयामी विकास घडवून आणला परंतु गुणात्मक विकासाऐवजी संख्यात्मक विकास झाला. शिक्षणाचे स्वरूप सामान्यतः वसाहतवादी राहिले. सध्याच्या काळाचा आढावा घेतला तर त्यात हळूहळू बदल दिसून येतात. स्वातंत्र्यानंतर, १९४८-४९ मध्ये राधाकृष्णन यांनी विद्यापीठ शिक्षण आयोग (UEC) स्थापन केला. नव्याने स्थापन झालेल्या सार्वभौम राष्ट्राच्या गरजा आणि आकांक्षांना स्वतंत्र भारताच्या शिक्षण पद्धतीला अनुकूल करण्यावर त्यात भर देण्यात आला.

भारतीय शिक्षण व्यवस्थेची स्थापना कोठारी आयोगाच्या माध्यमातून झाली. या समितीच्या निकालांनी १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मार्ग मोकळा केला, ज्याने भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या भविष्यातील विकासाचा पाया घातला. राष्ट्रीय शिक्षण धोरण, १९६८ ने सांस्कृतिक आणि आर्थिक विकास तसेच राष्ट्रीय एकात्मता सुधारण्यासाठी "जोरदार सुधारणा" आणि शैक्षणिक संधींचे समानीकरण करण्याचे आवाहन केले आहे. १९८५च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे ध्येय शिक्षणातील असमानता दूर करणे आणि समाजातील सर्व सदस्यांना, विशेषतः उपेक्षितांना समान शैक्षणिक संधी प्रदान करणे हे होते. देशभरातील प्राथमिक शाळा सुधारण्यासाठी "ऑपरेशन ब्लॅकबोर्ड" सुरू करण्यात आले. इग्नूची स्थापनाही याच शैक्षणिक धोरणातून झाली. वर्ष १९९२मध्ये, शैक्षणिक धोरण, १९८६ मध्ये सुधारणा करण्यात आली ज्याद्वारे आपल्या मोठ्या युवा लोकसंख्येच्या समकालीन गरजा आणि भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक बदल करण्यात आले.

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत शिक्षण व्यवस्थेशी संबंधित विशिष्ट तरतुदी करण्यात आल्या होत्या. संवैधानिक तरतुदींच्या प्रकाशात, ८६ व्या घटनादुरुस्ती २००२ द्वारे, मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा मूलभूत अधिकार (अनुच्छेद २१A) आणि धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वात (अनुच्छेद ४५A) समाविष्ट करण्यात आला. या घटनात्मक तरतुदींना आकार देण्यासाठी सरकारने मोफत आणि सक्तीचे शिक्षण कायदा २००९ मंजूर केला. सक्तीचे शिक्षण म्हणजे ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देणे आणि त्यांची अनिवार्य नोंदणी, उपस्थिती आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे सुनिश्चित करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. वरील तरतुदींमुळेच सर्व शिक्षा अभियान, २००१ सारख्या कार्यक्रमांचा झपाट्याने विस्तार झाला आणि त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले.

टी आर एस . सुब्रमण्यम आणि कस्तुरीरंगन समितीच्या अहवालाने भारतासाठी नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.



सुब्रमण्यम समितीने मे २०१६ मध्ये सरकारला अहवाल सादर केला. भारताच्या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी सरकारने अनेक सुधारणा आणि नाविन्यपूर्ण पुढाकार घेण्याची गरज असल्याचे त्यात सुचवण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० ने भारताच्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणला.२१ व्या शतकासाठी योग्य भारतीय शिक्षण व्यवस्थेची रचना विकसित करणे हा त्याचा उद्देश आहे. मुलांना साक्षर बनवणे हाच मुख्य उद्देश नसून त्यांच्यात योग्य सामाजिक आणि भावनिक कौशल्ये विकसित करणे हा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात २०३०पर्यंत शालेय शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामध्ये अभ्यासक्रमाच्या रचनेसोबतच अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन पद्धतीतही बदल सूचित करण्यात आले आहेत. हा एक सर्वसमावेशक दस्तऐवज आहे ज्यावर चर्चा सुरू आहे. संसाधनांच्या कमतरतेच्या परिस्थितीत आपण आपल्या शैक्षणिक रचनेत आमूलाग्र बदल कसे घडवून आणू शकतो, असाही आरोप राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील प्रस्तावित सुधारणा केवळ संघराज्य आणि राज्य सरकारांमधील भागीदारीद्वारे लागू केल्या जाऊ शकतात कारण शिक्षण हा समवर्ती सूचीचा विषय आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने जागतिकीकरणाच्या या युगात आपला समाज अज्ञात भविष्याकडे वाटचाल करताना दिसतो. वाढती लोकसंख्या आणि मर्यादित संसाधने यामुळे आपल्या देशाला नवनवीन समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी, आपल्याला ज्ञान आणि कौशल्ये आवश्यक असतील जी आपल्या समस्या सोडवण्यास हातभार लावू शकतील. अनेक IIT आणि IIM सह राष्ट्रीय महत्त्वाच्या १५९ संशोधन संस्था. वरील संस्थांमध्ये महाविद्यालयांची संख्या जोडल्यास ही संख्या लाखावर पोहोचते. पण इतक्या शैक्षणिक आणि संशोधन संस्था आणि मानव संसाधने विपुल असूनही भारतात 'ज्ञान संस्कृती'चा विकास आणि विस्तार अजून वेगाने झालेला नाही. आपल्या बौद्धिक संपदेचा व्यावहारिक वापरही अपुरा आहे. आज 'ब्रेन ड्रेन' (टॅलेंट ड्रेन) ही भारताची मोठी समस्या आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, २६% पेक्षा जास्त भारतीय अजूनही निरक्षर आहेत, जे एक अतिशय भयानक आकडा आहे कारण एक राष्ट्र म्हणून आपल्या महत्वाकांक्षा अधिक मागणी करतात. कोरोना संकटाने भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक आव्हानेही निर्माण केली आहेत. आपली शिक्षण व्यवस्था किती तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनवायची आहे, हे या संकटातून कळू शकते. आज शैक्षणिक संस्थांची स्थापना आणि व्यवस्थापन हा एक फायदेशीर उद्योग बनला आहे;

गेल्या ७५ वर्षांत आपण शैक्षणिक क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली असली तरी आपल्या शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक प्रश्न गंभीर आव्हाने आहेत. जागतिकीकरण आणि बाजारीकरणाच्या युगात आपली शिक्षण व्यवस्था भारतीय समाजाशी सुसंगत करण्याची गरज आहे. सध्याच्या काळात विद्यार्थ्यांच्या संबंधात शिक्षकाची भूमिका अधिक महत्त्वाची बनत चालली आहे, कारण त्याला मुलांचा बौद्धिक, नैतिक, मानसिक आणि शारीरिक विकास तर करायचा आहेच, शिवाय सामाजिक, चारित्र्य आणि भावनिक विकासही करायचा आहे. .आजच्या शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांचे विचारही अतिशय समर्पक आहेत. गांधीजींच्या 'सर्वोदयी समाजा'मध्ये शिक्षणाला महत्त्वाचे स्थान असताना डॉ.बाबासाहेबआंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समतेचे महत्त्वाचे हत्यार मानले.

# चित्रपटातील शिक्षकाच्या विविध छटा



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली


आधुनिक केसरी

**समाजात राहणाऱ्या आणि प्रत्येक व्यवसायाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीला सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात स्थान मिळाले आहे. समाजाला दिशा देणाऱ्या शिक्षकांवरदेखील अनेक चित्रपट बनवले गेले आहेत. कधी छोट्याशा स्वरूपात, छोट्या भूमिकेत तर कधी मुख्य पात्र म्हणून चित्रपटांच्या माध्यमातून शिक्षक प्रेक्षकांसमोर आला आहे. शिस्तप्रिय शिक्षक: काही दशकांपूर्वी 'जागृती' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता, ज्यामध्ये अभि भट्टाचार्य यांनी शिस्तप्रिय आणि प्रतिष्ठित शिक्षकाची भूमिका साकारली होती. ते आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षित करण्याबरोबरच शिस्त लावण्यासाठी विविध पद्धतीचा अवलंब करायचे. या चित्रपटातील 'आओ बच्चों तुम्हे दिखाएं झांकी हिंदुस्तान की' आणि 'दे दी हमें आजादी' ही गाणी खूप गाजली.**


विनोद खन्ना यांच्या 'इम्तिहान' या चित्रपटातही शिस्तप्रिय शिक्षकाला दमदारपणे सादर करण्यात आले होते. ते एक असे शिक्षक होते जे विद्यार्थ्यांमध्ये राहून त्यांच्या समस्या ऐकून घ्यायचे आणि त्या सोडवायचे. ते विद्यार्थ्यांसोबत खेळायचे आणि गरज पडेल तेव्हा त्यांना फटकारायचेही. त्यावेळी विनोद खन्नाने त्याच्या प्रतिमेच्या विरुद्ध ही धडाकेबाज प्राध्यापकाची भूमिका साकारली होती आणि त्याचे कौतुकही झाले होते.

**एकनिष्ठ आणि समर्पित शिक्षक :** राजकुमारने 'बुलंदी' चित्रपटात प्राध्यापकाच्या भूमिकेत जीव ओतला होता. एक निष्ठावंत पण दबंग प्राध्यापक जो कोणत्याही बाबतीत तडजोड करणार नाही, अशी ती व्यक्तिरेखा होती. बेलगाम विद्यार्थ्यांशी आपल्याच शैलीत वागणारा हा प्राध्यापक शेवटी घराणेशाही आणि पक्षपाताचा बळी ठरतो. ही असहायता राजकुमारने पडद्यावर अगदी उत्तम प्रकारे उतरवली होती. त्याच धर्तीवर 'प्रतिघात' आला, ज्यात सुजाता मेहता यांनी विद्यार्थी राजकारण आणि त्यात अडकलेल्या प्राध्यापकाच्या भूमिकेत उठावदार कामगिरी केली होती.


**नव्या शैलीत शिक्षकाचे अध्यापन:** आमिर खानने 'तारे जमीन पर'मध्ये एका शिक्षकाच्या भूमिकेत एक नवीन शैली सादर केली जी बाल मानसशास्त्र समजून घेते आणि त्यांचे गुण ओळखून त्यांचे व्यक्तिमत्व घडवते. चित्रपटातील त्याची शिकवण्याची शैली प्रेक्षकांना भावली. गुलजार दिग्दर्शित 'परिचय' या चित्रपटात पारंपारिक शैली सोडून इतर खेळांच्या माध्यमातून शिकवण्याची कला शिकवण्याचा संदेश देणाऱ्या गुलजार दिग्दर्शित 'परिचय' या चित्रपटात आपल्या




विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकाची भूमिका जितेंद्रने साकारली होती. या चित्रपटाद्वारे जितेंद्रने त्याची जंपिंग जॅक इमेजही खोडून काढली होती. हिंदी चित्रपटांमध्ये अभि भट्टाचार्य, सत्येन कप्पू असे काही कलाकार आहेत जे शिक्षकाच्या भूमिकेत परिपूर्ण दिसले होते. पण काही चित्रपट असेही बनले आहेत ज्यात चॉकलेट हिरो किंवा स्टार दर्जाचे कलाकारदेखील शिक्षक म्हणून दिसले आहेत. 'हम नौजवान' आणि 'मनपसंद'मध्ये देवानंद प्रोफेसरच्या भूमिकेत दिसला होता, तर शम्मी कपूरही 'प्रोफेसर'मध्ये काही प्रमाणात असाच दिसला होता. 'कोरा कागज'मध्ये विजय आनंद एका गंभीर शिक्षकाच्या भूमिकेत दिसला होता, तर




राजेश खन्ना यांनी 'मास्टर जी' आणि 'रोटी'मध्ये शिक्षकाची भूमिका साकारली होती. शिक्षकाच्या सशक्त भूमिकेबद्दल सांगायचे तर, आपल्या मुलाची अस्थी मिळण्यासाठी दीर्घकाळ संघर्ष करणाऱ्या 'सारांश'चे अनुपम खेर यांना कोणीही विसरू शकत नाही. तर चॉकलेट हिरो हृतिक रोशननेही 'सुपर ३०'मध्ये शिक्षकाची ऑफबीट भूमिका साकारली होती. अमिताभ बच्चन यांनीही अनेक चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या शैलीत शिक्षकाची भूमिका साकारली आहे. 'कस्मेवादे' या चित्रपटात त्यांनी एका समर्पित प्राध्यापकाची भूमिका साकारली होती, जो विद्यार्थ्यांमधील संघर्ष सोडवण्यासाठी आपल्या प्राणाची आहुती देतो. ते 'आरक्षण'मध्ये सिद्धांतवादी




प्रोफेसर होते तर 'सत्याग्रह'मध्ये निवृत्त शिक्षक आणि 'मोहब्बतें'मध्ये कडक शिक्षकाच्या भूमिकेत दिसले होते. 'ब्लेक'मध्ये त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्याला प्रशिक्षण देण्याच्या भूमिकेत प्राण फुंकले होते तर 'चुपके चुपके'मध्ये ते एका सभ्य प्राध्यापकाच्या भूमिकेत दिसले होते. बोमन इराणी यांनीदेखील शिक्षक म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. विशेषतः त्यांचे '3 इडियट्स' आणि 'मुन्ना भाई एमबीबीएस' हे दोन चित्रपट लक्षवेधी ठरले आहेत. अशा शिक्षकांमध्ये 'स्वदेश' मधील गावात राहणाऱ्या मुलांना शिकवणाऱ्या शिक्षिका गायत्री जोशी आणि 'हिचकी'मध्ये शिक्षिकेची भूमिका साकारणारी राणी मुखर्जी यांचीही नावे समोर येतात.

क्रीडा प्रशिक्षक म्हणूनः शिक्षकाचे एक नवीन रूप म्हणजे प्रशिक्षक हे क्रीडा आधारित चित्रपटांमध्ये दिसले आहे. 'चक दे इंडिया'मध्ये प्रशिक्षक शाहरुख खान कमकुवत असलेल्या भारतीय महिला हॉकी संघाला विजेतेपद मिळवण्याइतपत सक्षम बनवतो. आमिर खान स्टारर 'दंगल' या चित्रपटात वडीलच आपल्या मुलींचे प्रशिक्षक बनतात आणि त्यांना क्रीडा विश्वातील एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बनवण्याचा प्रयत्न करतात. राजकिरण अभिनीत 'हिप हिप हुर्रे' हा शिक्षक-विद्यार्थी संबंध दर्शविणारा सर्वोत्कृष्ट चित्रपट आहे. राजकिरण त्याच्या फुटबॉल टीमच्या विद्यार्थ्यांना जिंकण्यासाठी प्रेरित करताना दिसतो, तर नसीरुद्दीन शाह यांनी 'इकबाल'मध्ये ड्रग व्यसनी प्रशिक्षकाची भूमिका साकारली आहे.

नसीर यांनी 'सर'मध्येदेखील शिक्षकाची प्रभावी भूमिका साकारली होती. **विनोदी भूमिकेत शिक्षक :** 'कुछ कुछ होता है' आणि 'शोला और शबनम' सारख्या अनेक चित्रपटांमध्ये शिक्षकांची खिल्ली उडवली गेली आहे. त्यांच्यामध्ये अनुपम खेर आणि अर्चना पूरण सिंगसारखे प्राध्यापक आहेत, जे कॉमिक शैलीत रोमान्स करत राहतात. कॉलेज कॅम्पसच्या पार्श्वभूमीवर बनवलेल्या इतर अनेक चित्रपटांमध्ये शिक्षकांना विनोदी कलाकार म्हणूनही दाखवण्यात आले आहे.'जंगल में मंगल'मध्येही प्राणने अशाच शिक्षकाची भूमिका साकारली होती. कादर खाननेही अनेक चित्रपटांमध्ये विनोदी शिक्षकाची भूमिका साकारून प्रेक्षकांची दाद मिळवली आहे. सांगायचा सारांश असा आहे की शिक्षकाची व्यक्तिरेखा अनेक चित्रपटांमध्ये दिसली आहे, मात्र प्रेक्षकांनी त्याचे कधी कौतुक केले आहे तर कधी नाकारले आहे.

# आत्मपरीक्षेतूनच साधेल प्रतिष्ठा

आधुनिक केसरी


**शिक्षक हा समाज व्यवस्थेसाठी सातत्याने आदर्शवत राहिला आहे. जगात शांतता नांदावी आणि समाजाची प्रगती होऊन समृध्दता नांदावी म्हणून मनुष्यबळ विकसित करणारा शिक्षक हा सर्वात महत्वाचा घटक मानला गेला आहे. शिक्षकांनी मनात आणले तर काय परिवर्तन होते याचा इतिहास आहे. शिक्षकांच्यामध्ये सामावलेली शक्ती आणि भक्तीभावच राष्ट्राचे उत्थान घडू शकते. त्याकरीता देशातील शिक्षक अधिक ज्ञानसपन्न आणि जबाबदारीची जाणीव असणारे असायला हवीत अशी अपेक्षा सातत्याने केली जाते. समाजमनात विकासाची स्वप्न पेरणारा शिक्षक असतो. सर्जनशीलतेने कला, विज्ञान, संशोधन, साहित्यात भरारी घेण्यासाठी मनामनात पेरणी करणारा शिक्षकच असतो. विकासाची दृष्टी देणारा शिक्षक असतो. मनामनात शक्ती देणारा शिक्षक असतो.**

विकासाला माणूसपणाची जोड देणारा शिक्षक असतो. माणंसात माणूसपण पाहण्याची दृष्टी प्रदान शिक्षक असतो. शिक्षक काय नसतो...? शिक्षक अवघ विश्व शांततेच्या दिशेने चालत राहावे या करीता चालणारा शांततेचा दूत असतो. अज्ञानाच्या अंधकारात ज्ञानमय प्रकाशाची ज्योत प्रज्वलीत करणारा प्रकाशदूत असतो.अस बरेच काही असणाऱ्या शिक्षकात सामावलेल्या शक्तीची ओळख करून देण्यासाठी माजी राष्ट्रपती ब्दूल कलामानी शिक्षकांच्या अंतरिक मनाला जागृत करण्यासाठी प्रतिज्ञा पेरली आहे. मोठेपणाबरोबर शिक्षकांना जबाबदारीचे भान देणारी ही प्रतिज्ञा प्रत्येकाला अभ्यासायला आणि आचरणात आणायला हवी.त्या पाऊलवाटेने आपण चालू लागलो तर ‘ स्व ’ आणि ‘ राष्टाचे ’ उत्थान फार दूर नाही. आजच्या शिक्षक दिनी या वाटेने चालण्याचा निर्धार केला तर भविष्य अधिक उज्वल असेल यात शंका नाही.

सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न होता आहेत. अलिकडच्या काळात डॉ.ए .पी.जे.अब्दूल कलाम यांनी देखील राष्ट्र उत्थान केंद्रस्थानी माणून शिक्षणाचा मार्ग निवडला आहे.या महापुरूषांनी शिक्षण आणि शिक्षकाचे मोल जाणले होते. शिक्षकांसाठींची प्रतिज्ञा जबाबदारीचे भान देणारी आणि कर्तव्याची भावना जागृत करणारी आहे. प्रतिज्ञेच्या शब्दांचे अनुभव घेत प्रवास सुरू ठेवला तर जीवनसमृध्दतीचा प्रवास सुरू करणे शक्य होईल. कलामांनी समग्र जीवनभर शिक्षकांप्रति असलेला आदरभाव सातत्यांने व्यक्त केला.

विद्यार्थी हा त्यांच्यासाठी अंत्यत महत्वाचा घटक राहीला आहे. विद्यार्थ्यांशी सातत्यांने संवाद साधने ही त्यांना आवडणारी गोष्ट होती. शिक्षण हे समाज व राष्ट्रनिर्मितीचे महत्वाचे साधन आहे. त्यांच्या आयुष्यात आलेल्या अनेक शिक्षकांपैकी काही शिक्षकांबददलचे शब्दबध्द केलेल अनुभव शिक्षकांची उंची स्पष्ट करणारे आहे. या शिक्षकाप्रति असलेली मनातील भावना म्हणजे शिक्षकांच्या प्रति असलेला आदरभाव व्यक्त करणे आहे. तो आदरभाव का ? हे सांगताना त्यांनी शिक्षकांनी मनापासून केलेल्या अध्ययन अध्यापनासंदर्भाने लिहिले आहे. खरा शिक्षक तर विद्यार्थ्यांच्या प्रेमासाठीच जगत असतो. नवनविन पध्दतीने अध्यापन, तंत्र, अध्ययन अनुभवाची रचना जशी स्वतःला समृध्द करते त्या प्रमाणे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला संस्कारीत करत असते. त्यामुळे निर्माण होणारा आनंद शिक्षकांना आनंद देतात त्या प्रमाणे विद्यार्थ्यांना देखील शिकण्यात अधिक समाधान देऊन जातात. चेहऱ्यावरील भाव शिक्षकांचे अंतकरण सांगून जातात. शिक्षंकाप्रती समाजात आदर संपला आहे हे काही पूर्णतः खरे नाही. ज्या शिक्षकांनी आपल्यातील सत्व जपले आहे.अभ्यासूपणा आणि ज्ञानाची साधना कायम ठेवली आहे त्यांच्याप्रती आजही समाजमानत आदर कायम आहे.

जेव्हा एखाद्या व्यवसायाचा, व्यक्तीचा आदर कमी होतो तेव्हा त्याबाबत आत्मपरिक्षणाची निंतात गरज असते. ज्यांनी आपली जबाबदारी आणि कर्तव्यभावना जीवनभर जपल्या आहेत त्यांच्यासाठी आजही मस्तक त्यांच्या चरणावर नतमस्तक होतांना जग अनुभवत आहे. कलाम आपल्या प्रतिज्ञेत म्हणतात “ मी निष्ठावान शिक्षक आहे. शिकवण्यावर माझे प्रेम आहे. ते काम मी मनापासून करीन ” कलामानी शिक्षकांच्या संदर्भाने



मांडलेला विचारांचा निश्चित विचार करण्याची गरज वर्तमानातही कायम आहे. शिक्षक हा आपल्या पेशाशी, विद्यार्थ्यांशी निष्ठा बाळगणारा असतो . त्याची आपल्या पेशावर निष्ठा असते. त्या निष्ठेची उंची अधोरेखित होण्यासाठी ते सतत प्रयत्न करत असतात. निष्ठा जोपासणे म्हणणे अखंड ज्ञानाची साधना आहे. त्यासाठी पुस्तकांशी संगत करणे आहे. नवनविन अध्ययन अध्यापन पध्दतीचा विचार करणे आहे. आपल्या कामावरील निष्ठा असल्याने त्या पेशावर त्यांचे प्रेम असते. त्याप्रेमापोटी ते त्यातून स्वतःचा आनंदशोधत असतात. प्रत्येक काम आनंदाने करणे असते. निष्ठा असेल तर आपण त्या दिशेने अधिक समृध्दतेचा प्रवास करत जातो.आपला परिचय देखील अधिक संपन्नतेने व्हावा या करता शिक्षक कार्यरत राहत असतो. विद्यार्थी हे उत्तम शिक्षकांसाठी नेहमीच सर्वस्व असतात. त्याच्या विकासात शिक्षकांचे अनन्य साधारण योगदान महत्वाचे असते.विद्यार्थ्यांच्याप्रति असलेले प्रेमच त्यांच्यासाठी प्रेरक असते. त्यामुळे शिक्षकांची निष्ठा स्वतःच्या व्यवसायाशी जितकी अधिक असेल तितका आदरभाव अधिक असणार आहे. शिकवण्यावर माझे प्रेम आहे.असे सांगतांना अध्यापन किती महत्वाचे आहे हे अधोरेखित होते. जेव्हा आपण आपल्या कर्तव्याचा भाग म्हणून अध्यापनाचा विचार करतो तेव्हा ते जर प्रभावी आणि परिणामकराक होत नसेल तर मी जबाबदारी टाळत आहे. अध्यापनात नाविन्य, चैतन्य, सृजनशीलता, कल्पकता आणि जीवनाचे संदर्भ नसतील ते शिकवणे हे कुचकामी आहे. शिकवण्यावर प्रेम असणार माणूस आपण जे शिकवितो त्या घटकाभोवतीचा भवताल जाणून शिकविण्याचा प्रयत्न करत असतो. त्या शिकविण्यावरती त्याचे अखडं प्रेम असते आणि त्यांच्या प्रत्येक कृतीत विद्यार्थ्यींचे हित सामावले असते. आपल्या अध्ययन अध्यापनावर स्वतःचे प्रेम असते. शिकवलेले विद्यार्थ्याच्या गळी उतरवण्यासाठी अनेकदा नाविन्यपूर्ण प्रयत्न केले जात असतात. एखाद्या विद्यार्थ्याला जोपर्यंत समजत नाही, तोपर्यंत मी शिकवित राहील.नव्यानव्या पध्दतीचा शोध घेत राहील. विद्यार्थ्याला शिकण्याचा आनंद जोवर मिळत नाही तोपर्यत शिक्षक प्रयत्न थांबवत नाही. खरेतर अध्यापनावर प्रेम असेल तर त्यात आनंद भरलेला असतो. प्रेम हा आनंदाच्या सोबत येणारा भाव आहे. त्यामुळे शिकवण्यावर प्रेम करणे आवश्यक आहे. ते काम मनापासून करण्याचा विचार ते प्रतिपादन करतात. शिकविणे हे केवळ काम नाही. ते समाज व राष्ट्र निर्मितीचे काम आहे. त्यामुळे ते काम मनापासून करणे आवश्यक आहेच. योगी अरविंद ज्या पध्दतीने स्वतःचे अध्यापन करण्यासाठी रात्रदिंन अभ्यासाची साधना करीत होते.

त्या साधनेत स्वतःच्या व्यवसायावरील प्रेम होते. त्यात विद्यार्थ्यांची हिताची दृष्टी होती. त्यामुळे पेशावर प्रेम असेल तर अभ्यासात डुंबून घेणे आपोआप घडते. पेशावरील प्रेमाने त्यासाठी करावयाच्या कामाचा मग कोणालाही भार वाटत नाही आणि त्यातून नकाराची भावना निर्माण होत नाही. प्रत्येक कामात आनंद सामावलेला असतो.जेथे आनंद आहे त्या कामातून मग तणाव देखील येत नाही. त्या दृष्टीने त्यांच्या प्रतिज्ञेतील संदशे खूप काही सांगून जाणारा आहे तो लक्षात घ्यायला हवे. शिक्षक दिनाच्या निमित्ताने राधाकृष्णन यांच्या अंगी असलेल्या अभ्यासाचा गुण अंगी बानवला तर आपल्याला प्रगत राष्ट्राच्या दिशेने प्रवास करणे सहज शक्य आहे. शिक्षक हा अखंड ज्ञानसाधनेचा पूजक असायला हवा.तीच ज्ञानाची वाट शिक्षकांची उंची वाढविते ,पण त्यापेक्षा त्या ज्ञानसाधनेतून राष्ट्र व समाजाची उंची वाढत असते. समाजात शिक्षकांच्या ज्ञानाच्या उंचीपेक्षा इतर कोणाची अधिक उंची असू शकत नाही. त्यामुळे शिक्षकांच्या अखंड ज्ञानसाधनेतून देश घडत असतो. शिक्षक भूतकाळातील ज्ञानावर फार काळ बढाया मारू शकत नाही. तो ज्ञानाचा प्रस्फोट होत असल्याने त्यांने ज्ञानाची महती जाणलेली असते. अखंड ज्ञानसाधना हीच शिक्षकांच्या प्रतिमेची उंची वाढवणारी पाऊलवाट आहे. असे ज्ञानसंपन्न शिक्षक हे समाजाचे भांडवल आहे. त्यामुळे शिक्षक दिनांचे निमित्ताने शिक्षकांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करायला हवी. जो समाज शिक्षकांच्या प्रति कृतज्ञतेचा भाव व्यक्त करत नाही त्या समाजाला कोणतेही भविष्य असत नाही हे वास्तवही लक्षात घ्यायला हवे.. पण त्यासाठी शिक्षकाने सतत आत्मपरिक्षणाची वाट चालण्याची गरज आहे.

संदीप वाकचौरे

# शैक्षणिक, सामाजिक प्रबोधनाचा वसा चालवणारे झगरे गुरुजी



प्रा.बाळासाहेब बोराडे,
संपर्क क्र.९४२३१५९९९३

आधुनिक केसरी

**विद्यार्थी व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासोबतच समाज घडविण्याचे अर्थातच मानवतेचे मंदिर उभे करण्याचे महान कार्य शिक्षकामार्फत केल्या गेल्याचा इतिहास सर्वश्रुत आहेच.परंतु अलीकडच्या काळात गुरुजींची केवळ शैक्षणिक कार्यातील सक्रियता बघायला मिळते.अशातच आपले शैक्षणिक कार्य अत्यंत प्रभावीपणे व उपक्रमशीलतेने पार पाडून स्वतः आदर्श कृतीने जीवन जगून समाजप्रबोधनाची धुरा सांभाळण्याचे कार्य करणारे शिक्षक हे क्वचितच बघायला मिळतात. अशा महान शिक्षकांमध्ये ज्ञानेश्वर झगरे गुरुजी यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. २००८ मध्ये शिक्षकी पेशा स्वीकारणारे झगरे गुरुजी यांच्या नोकरीची सुरुवात जाफराबाद तालुक्यातील घाणखेडा या गावी झाली.**

स्वतः त्या गावात वास्तव्य करत त्यांनी या शाळेचा अमुलाग्र कायापालट केला. यामध्ये शाळेच्या भौतिक सुविधा बरोबरच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवून अनेक शिष्यवृत्तीधारक व नवोदय विद्यालय प्रवेशित विद्यार्थी घडविले. या कार्यासोबतच त्यांनी या गावात सामाजिक प्रबोधनाचा वसा चालवत वृक्षारोपण, जलसंवर्धन, संत विचाराची रुजवणूक व सामाजिक सलोख्याच्या विविध कार्यक्रमांमध्ये आवर्जून सहभाग घेत ते गावकऱ्यांच्या गळ्यातील ताईत बनुन राहिले.

प्रशासकीय बदलीनंतर भोकरदन तालुक्यातील उमरखेडा या शाळेत आलेले झगरे गुरुजी यांनी येथील प्राथमिक शाळेचा सुद्धा अगदी चेहरामोहरा बदलून टाकत समाज आणि शाळा यांच्यातील अतूट नाते निर्माण केले. शाळेचा भौतिक कायापालट करण्यासाठी समाजाचा भरभरून प्रतिसाद घेण्याची हातोटी असलेल्या गुरुजींनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजाचा सहभाग शाळेसाठी मिळवला याबद्दल तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी



मनुज जिंदल साहेब यांनी शाळेत जाऊन त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले होते. शाळेतील भौतिक सुविधा बरोबरच तंबाखूमुक्त शाळा अभियान आणि व्यसनमुक्त भारत या कार्यक्रमात गुरुजींनी केलेले कार्य हे राज्यभर आदर्श मानले जाते, यासाठी त्यांना व्यसनमुक्तीचा महाराष्ट्ररत्न हा पुरस्कार सुद्धा मिळालेला आहे. विद्यार्थ्यांना हसत खेळत व विविध कलाकृतींच्या आधारे अभ्यासाची गोडी लावून गुणवत्तापूर्ण वर्ग निर्माण करण्याची गुरुजींची हातोटी ही विशेष आहे. स्वतः गायन, वादन करणाऱ्या गुरुजींनी विद्यार्थ्यांना लेझीम वरील पाढे, चला जिंकूया चालता बोलता, वाचू आनंदे अशा विविध उपक्रमांतून विद्यार्थी विकास साधलेला आहे.शालेय कार्य करण्यासोबतच गुरुजींनी आजपर्यंत शेकडो कीर्तनाच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्व,शासकीय योजना, पुरग्रस्तांसाठी मदत निधी गोळा करणे,बेटी बचाव बेटी पढाव,आई-वडिलांची सेवा, वृक्षारोपण, भूतदया यासारखे संतांचे प्रबोधनात्मक विचार समाजापर्यंत पोहोचवण्याचे कार्य अविरतपणे चालू ठेवलेले आहे. त्यांच्या कीर्तनातील खुबिदार व्याख्यानाने ते तरुण श्रोत्यांच्या हृदयात स्थिरावलेले आहे. रक्तदान शिबिर, सिड बॉल तयार करणे,




पर्यावरण पूरक वृक्षदिंडी अशा विविध उपक्रमांतून कार्य करणाऱ्या गुरुजींच्या कार्याची दखल घेऊन याच वर्षी फेब्रुवारी मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे.

# सावळदबारा येथे सुजाण मराठा बांधवांसाठी शांतता बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे भगवान श्री चक्रधर स्वामी मंदिरावर जालना जिल्ह्यातील अंतरवाडी सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या लाठीचार्ज झाला यासंदर्भात दि.३/९/२३ रविवार रोजी फर्दापूर पोलिस स्टेशनचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दर्पूर पोलिस स्टेशन हद्दीतील सावळदबारा परिसरातील सर्व सुजाण मराठा बांधवांना शांततेचे आवाहन सपोनि भरत मोरे यांनी शांतता कमिटीच्या बैठकीत केले आहे. यापूर्वी आपल्या मराठा मोर्चाची दखल अवघ्या देशाने नव्हे तर जगाने सुद्धा घेतली आहे.

मराठा आरक्षण हा मुद्दा सध्या न्यायप्रविष्ठ असून सध्याच्या परिस्थितीचा काही समाजकंटक त्यांच्या स्वार्थापायी सदर आंदोलनाला हिंसक वळण देण्याचा प्रयत्न करतील. आपण आपल्या गावात, शहरात, वस्तीत तसेच जिल्ह्यात अशा ठिणग्या पेटू देऊ नका त्याला हवा न देता त्यात तिथेच विझवून टाका. आपल्या परिसरात गालबोट लागेल असे कृत्य कोणीही करु नये,मित्रांनो गैर कायद्याची मंडळी जमविणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, जाळपोळ करणे, दगडफेक



करणे, रास्ता रोको करणे हे अजामीन पात्र व गंभीर स्वरूपाचे गुन्हे असून आपण आपला स्वतःचा आई-वडिलांचा तसेच मुलाबाळांचा विचार करावा. खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच सोशल मीडियावर आक्षेपार्ह मेसेज फॉरवर्ड करू नये. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास पोलिसांना सहकार्य करावे, पुढील येणारे सण उत्सव आनंदात साजरे करावेत तुम्हाला परवाना लागत अशल्याश मला साधे व्हाट्सअप करा मी देईल असे सखोल मार्गदर्शन शांतता कमिटीच्या बैठकीत करण्यात आले. यावेळी सरपंचपती शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो. लुखमान, प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते, प्रा. मदनभाऊ डोखळे, मोहन सुरडकर, मनोहर जगताप, अंकुश कोते, आकाश गायकवाड, उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, पुजारी मंडळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बांगड्या पाठवून सरकारचा निषेध करते : नीलाताई पोकळे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पाटोदा मराठा क्रांती मोर्चाच्या



माध्यमातून जगापुढे आदर्श निर्माण करत लाखोंचे ५८ मोर्चे अतिशय शांततेत काढणारा मराठा समाज आजही आपल्या न्याय हक्कासाठी शांततेत आंदोलन करत आहे. परंतु शांत असलेल्या मराठा समाजावर कुठलेही कारण नसताना अशाप्रकारे अमानुष मारहाण करून देशात आणि राज्यात अराजकता निर्माण करण्याचा शिंदे पुरस्कृत भाजप सरकारचा डाव आहे. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवली सराटी याठिकाणी मनोज जरांगे व गावकरी अन्नत्याग आंदोलन करत असताना अचानकपणे पोलीस प्रशासनाला हाताशी धरून आंदोलनकर्त्या महिला भगिनीवर अतिशय अमानुष प्रकारे हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात अनेक लहान थोर आंदोलन कर्त्यांसह महिला भगिनींना अतिशय अमानुषपणे मारहाण करण्यात आली. शांततेत आंदोलन सुरू असताना व कुठलेही कारण नसताना अचानकपणे आंदोलन स्थळाला छावणीचे स्वरूप देत गोळीबार, लाठीमार करणे हे माणुसकीला काळीमा फासणारी घटना असून अशा प्रकारे महिला भगिनीला मारहाण करणे हे अतिशय निंदनीय व खेदजनक आसून त्यात मुख्यमंत्री शिंदे साहेब म्हणतात मी मराठा समाजाचा आहे म्हणून मराठा चहेरा म्हणून राज्य फिरतात व आंदोलन करत्या मराठ्यांच्या आया बहिणीवर पोलिसांना मार्फत हल्ले करत असतील तर अश्या डुप्लिकेट भावाला हिंदू धर्मातील पवित्र असलेल्या राखी पौर्णिमा सणाचे अवचित साधून राख्या ऐवजी बांगड्या पाठवून भाजप पुरस्कृत शिंदे सरकारचा जाहीर निषेध करते अशा प्रतिक्रिया भारतराष्ट्र समिती पक्षाच्या निलाताई पोकळे यांनी दिल्या आहेत.

# बैलगाडीवर वीज कोसळली; महिला ठार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** शेतातील कामे आटोपून बैलगाडीने घरी परतताना अचानक वीज पडून एका महिलेचा मृत्यू झाला. ही घटना मारेगाव तालुक्यातील गोरज शिवारात सोमवारी दुपारी घडली. सुवर्णा संजय कांबळे, (३२) असे मृत महिलेचे नाव आहे. महिला तिचा पती आणि एका मजुरासोबत शेतात गेली होती. दुपारी २ वाजताच्या सुमारास कामे आटोपून ते सर्व बैलगाडीने घरी परत येत असताना गोरज फाट्याजवळ त्यांच्या बैलगाडीवर वीज कोसळली. यात महिला जागेवरच मृत्यूमुखी पडली तर पती आणि सोबत असलेला शेतमजूर बेशुद्ध पडले. बैलही जखमी होऊन खाली पडलेला होता. घटनेची माहिती मिळताच मारेगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले.




# भाऊसाहेब काळे शिक्षक यांना सन्मान पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व लोकविकास बँकेचे संचालक व एक अभ्यासू व्यक्तिमत्व आणि शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारे व सामाजिक कार्य करणारे इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक भाऊसाहेब काळे यांची दखल विश्व फाउंडेशन ने घेतली. शिक्षक दिन सप्ताहाच्या प्रारंभास औरंगाबाद शिक्षण शहर समिती यांच्या वतीने व पु.डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले, अध्यक्ष विश्व फाउंडेशन आणि भागवत कराड केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व एम. के. देशमुख साहेब शिक्षणअधिकारी व जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी प्रा. जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या शुभहस्ते शिक्षक सन्मान पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# ऐन पावसाळ्यात अंगाची लाही लाही

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ऐन पावसाळ्यात मे महिन्याप्रमाणे कडक उन्ह पडत असल्याने अंगाची लाही लाही तर घामुघाम होण्याचे प्रकार सद्या सूरु असल्याचे चित्र आहे. कधी नव्हे एवढा ऐन पावसाळ्यात कडक उन्ह पडत असल्याने नागरिक गुरेढोरे पशुपक्षी हैराण परेशान झाले आहे. एकतर पाऊस नाही त्यात पावसाअभावी विज महावितरण कंपनीकडून विज खंडीत करण्यात येत आहे. तर सकाळ पासूनच मरणाचे कडक उन्ह पडत असून शेतात काम करणे शक्य होत नाही. कडक उन्हामुळे गुरेढोरे पशुपक्षी पाणी पाणी करत आहे. तर अधिक उन्हामुळे मोठा उकडा होत असल्याने नागरिक हैराण परेशान झाले आहे. विशेषकरून वृध्द बालके उन्ह उकड्यामुळे त्रस्त झाले आहे.पाऊस अभावी हा प्रकार घडत आहे.सद्या पाऊस थांबल्याने शेतकरी औषधी फवारणी निंदणी खुरपणी खते टाकणे पिक अंतर्गत कामे आटोपती घेत आहे.

# अंतरवाली प्रकरणी झालेल्या मारहाणीचा फुलंब्री तालुक्यात निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** जालन्यातील आंतरवली येथे आरक्षण मिळावे यासाठी उपोषणास बसलेल्यांवर लाठीचार्ज झाला या निषेधार्थ औरंगाबाद जळगाव महामार्गावरील फुलंब्री जवळील पाल फाट्यावर फुलंब्री तालुक्यातील गेवराई पायगा येथील ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश साबळे यांनी स्वतःची कार जाळत या झालेल्या घटनेचा निषेध केला. त्यांनी शासनास माहिती दिली की या झालेल्या घटनेची चौकशी करावी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली या प्रसंगी फुलंब्री तालुक्यातील मराठा समाजातील प्रतिष्ठित नेते व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# गोळ्या झाडल्या त्यांना मराठवाड्यात पाय ठेवू देऊ नका

## मराठा आरक्षणाचे राजकारण झाले : राज ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**जालना :** अंबड तालुक्यातील आंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्जचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत आहेत. महाराष्ट्रातील सर्वच दिग्ज नेत्यांनी अंतरवाली सराटीसह अंबड येथील शासकीय रुग्णालयात जाऊन जखमी आंदोलकांची भेट घेतल्या आहेत. आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी आंतरवली सराटी येथे जाऊन आंदोलकांशी संवाद साधला. मनोज जरांगे पाटील यांच्याशी जवळपास 20मिनिटे चर्चा करून घडलेल्या घटनेची माहिती जाणून घेतली. यानंतर राज ठाकरेंनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.ते पुढे बोलताना म्हणाले की ज्या ज्या वेळी मी या गोष्टी सांगितल्या त्या त्या वेळी चुकीच्या पद्धतीने तुमच्याकडे पोहचविल्या. लाठी हल्ल्यात तुम्ही पोलिसांना दोष न देता त्यांना गोळ्या झाडण्याचे आदेश ज्यांनी दिले त्यांना दोषी ठरवा असेही ठाकरे म्हणाले. जातीचं, आरक्षणाचं आमिष दाखवून निवडणुकीत मतं मिळवली जातात. म्हणून राजकारण्यांच्या नादी लागू नका हे मी आधीच सांगितले होते. आरक्षणाची कायदेशीर बाजू देखील समजून घेतली पाहिजे. मी इथे राजकारण करायला नाही तर तुम्हाला विनंती करायला आलो आहे.
महाराष्ट्रात नेत्यांनी मराठा आरक्षणाचं राजकारण केलं. त्यामुळे ज्यांनी तुमच्यावर गोळ्या झाडण्याचे आदेश दिले त्यांना तुम्ही मराठवाड्यात पाय ठेवू देऊ नका असे राज ठाकरे म्हणाले.
राज ठाकरेंनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेची झोड उठवली. फडणवीस म्हणतात झालेल्या गोष्टींचे राजकारण करू नका, पण फडणवीस विरोधात असते तर त्यांनी काय केले असते? असा प्रश्न ठाकरे यांनी उपस्थित केला. माझ्या माता भगिनींवर अमानुषपणे लाठीमार



झाला त्या काठ्यांचे वळ निवडणुकीत लक्षात ठेवा असेही ठाकरे म्हणाले. गेंड्याच्या कातडीच्या राजकारण्यांसाठी तुमचा जीव गमावू नका.मराठा बांधवांनी वेळीच सावध झाले पाहिजे. गडकिल्ले हे आमचे वैभव आहे. त्याचे जतन झाले पाहिजे. ते सोडून सरकार छत्रपती शिवरायांच्या पुतळा उभा करायचा हे सांगून मतं मागण्यात काम करत आहे असा आरोपही ठाकरेंनी केला. तेव्हापासून मी सांगतोय छत्रपती शिवरायांचा इतका मोठा पुतळा समुद्रात शकत नाही. त्यापेक्षा आपले गडकिल्ले सुधारले पाहिजेत.तेच खरं स्मारक ठरेल.
मी आज तुमच्यासमोर भाषण किंवा राजकारण करायला आलो नाही. विनंती करायला आलो आहे. ज्या लोकांनी तुमच्यावर लाठ्या बरसवल्या त्या सर्वांना मराठवाड्यात पाऊल ठेवू देऊ नका.मला खोटं बोलता येत नाही. आता मी तुम्हाला कोणतेही खोटे आश्वासन देऊ शकत नाही. परंतु हा विषय मुख्यमंत्र्यांशी भेटून यावर काही मार्ग काढता येतो का ते पहातो असेही राज ठाकरे म्हणाले. यावेळी राज ठाकरेंनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या जखमीं आंदोलकांची भेट घेतली.



## लोणार शहरासह तालुका कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** अंतरवाली सराटी येथील मराठा समाजाच्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ शहरात आज, दि. ३ सप्टेंबर रोजी सकल मराठा समाज आणि विविध संघटनांच्या वतीने सरकारचा निषेध करून कडकडीत बंद पाळण्यात आला.शनिवारी, दि. ३ सप्टेंबर रोजी सकल मराठा बांधव आणि विविध संघटनांच्या वतीने शहर बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देऊन शहरातील व्यापाऱ्यांनी आज सकाळपासूनच आपली दुकाने बंद ठेवली. त्यामुळे बाजारपेठेत शुकशुकाट होता. वैद्यकीय सेवा वगळता लोणार बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**सुलतानपूर येथे कळकळीत बंद ठेऊन रास्ता रोको आंदोलन**
जालना जिल्हा येथील मराठा आंदोलकावर झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ सुलतानपूर येथे कडकडीत बंद व मुंबई नागपूर हायवे वरती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले .यावेळी संपूर्ण सुलतानपूर वाशीयांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून निषेध व्यक्त करत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला .सकल मराठा समाज बांधव व गावकऱ्यांनी रस्ता रोका करत मुंबई नागपूर महामार्ग वर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात येथे रस्ता रोको करत निषेध व्यक्त करताना नागवंशी संघपाल पनाड,भानदास पवार, रमेश भानापुरे, पुरुषोत्तम पाटील, संतोष पाटील, डॉ . कडुकर, शेख अमीर भाई, जाकीर खा पठाण, संतोष शिंदे, गोपाल भानापुरे, वैभव टकले, अनंता टकले, शंकर निलक,अभिषेक कुटे, सुरेश आश्रू मोरे, मधुकर खेत्रे, सागर निर्मळे व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते . यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला .

## पावसासाठी मुस्लिम बांधवांकडून बाजार सावंगीत अल्लाहकडे प्रार्थना

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ऑगस्ट महिना कोरडा गेला सप्टेंबर महिन्यात ही पावसाचे पुढे-पुढे तर पावसाभावी खरिप पिके जळण्याच्या मार्गावर असल्याने येथे मुस्लिम बांधवांकडून वृध्द तरुण बालके तीन दिवस मैदानात जावून अल्लाह कडे दुआ करत पावसाची मागणी केली. पावसाळ्याचे तीन महिने उलटले मात्र यंदा पावसाळ्यात जोरदार दमदार समाधानकारक पाऊस झाला नाही व ओढे नदी नाले तलाव कोरडे ठाक पडून आहे. यंदा मृग- आर्द्रा ची पेर असुण पुनर्वसु पुष्य नक्षत्रात नाममात्र पाऊस झाल्याने खरिप पिके टवटवीत चांगली असली तरी अर्धा पुष्य आश्लेषा मघा सर्वच नक्षत्र कोरडे गेले तथा ऑगस्ट महिनाच कोरडा गेला व पाचसहा पाऊस नक्षत्र कोरडे जावून चारपाच नक्षत्र शिल्लक आहे. त्यात पावसाचे आज उद्या म्हणत सप्टेंबर महिना ही कोरडा जात आहे.खरिप पिकें कापूस फुल कैऱ्यात आहे तर मका सोयाबीन बाजरी भुईमूग फुलाऱ्यात आहे व आज मोठ्या पावसाची गरज निर्माण झाली आहे.नसता चांगली आलेली खरिप पिके जळण्याच्या मार्गावर आहे.तर गुरें ढोरे चरिंद परिंद यांनाही पाणी पावसाची गरज व प्रतिक्षा आहे.मणुष्याच्या गुन्हे पापांची सजा गुराढोरांना पशुपक्षि प्राणी यांना भोगावी लागती की काय बघता सावंगी येथील मुस्लिम बांधवांनी कृषी उत्पन्न उप समिती (कापुस फेडरेशन) मैदानावर वृध्द बालके तरुण एकत्र येत येथे तीन दिवस 'नमाजे इसतीसका ' नमाज अदा करत दोन दोन खुदबे चे वाचन करून अल्लाह कडे दुआ करत पावसाची मागणी केली.या तीन दिवस गावांतील सर्व मुस्लिम बांधवांनी सहभाग घेतला हे विशेष.



## लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ वाशिम जिल्ह्यात कडकडीत बंद

### रिसोड येथे सार्वजनिक निषेध; कुठलाही अनुचित प्रकार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन सुरू होते. दरम्यान पोलिसांनी आंदोलकांवर लाठी हल्ला केला या घटनेचे संपूर्ण राज्यात तीव्र पडसाद उमटले. त्या अनुषंगाने काल ३ सप्टेंबर रोजी वाशिम जिल्ह्यात सर्व जाती धर्माच्या वतीने स्वयंस्फूर्तीने व शांततेत कडकडीत बंद पाळण्यात आला.

वाशिम शहरासह मालेगाव, रिसोड, मंगरूळपीर, कारंजा आदी शहरात जालना येथील घटनेच्या निषेधार्थ सर्व लघु व्यावसायिक व व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवली होती. परिणामी सर्वच व्यवहार ठप्प झाले होते. सकल मराठा समाजाच्या बांधवांना पाठिंबा देण्याच्या उद्देशाने सर्व समाजातील व विविध पक्षाच्या व संघटनांच्या कार्यकर्त्यांनी आपला स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून बंद यशस्वी केला. संपूर्ण जिल्ह्यात कुठलाही अनुचित प्रकार न घडता शांततेच्या मार्गाने बंद पाळण्यात आला.

रिसोड शहरात सकल मराठा समाजाच्या बांधवांसह विविध समाजातील युवकांनी तसेच सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन सदर बंद शांततेत व संविधानिक पद्धतीने पाळण्याचे आवाहन केले होते . त्यांच्या या आवाहनाला सर्व स्तरातून पाठिंबा मिळाला . त्या अनुषंगाने रिसोड शहरात शांततेत बंद यशस्वी झाला . यावेळी शहरातील जिजामाता चौक हिंगोली नाका येथे जमलेल्या अनेकांनी आपल्या संवेदना व्यक्त करून निषेध नोंदविला .





मराठा समाजातील सुशिक्षित तरुणांना कायद्याच्या कचाट्यात अडकवून, त्यांचे भविष्य उध्वस्त करण्यासाठी काही राजकीय शकुनीचे हे कारस्थान आहे .मी, सर्व समाजातील तरुणांना आवाहन करतो की, पोलिसाबद्दल कुठलाही द्वेष मनात न ठेवता त्यांनी आदेशाचे पालन करून कर्तव्य निभावले आहे . हे ओळखून घ्या . . ! कोणीही कायदा हातात घेऊन गैर मार्गाचा अवलंब करू नका . वाटल्यास येणाऱ्या निवडणुकीत संविधानाने दिलेला आपला अधिकार वापरून ज्याची त्याला जागा दाखवून द्या . . !
**अमोल नरवाडे, ( संस्थापक, दयावान ग्रुप )**



"आंदोलन कुठल्याही समाजाचे असो अथवा पक्षाचे, संघटनेचे असो . आपल्या न्याय हक्कासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे हा संविधानिक हक्क आहे . पण, शांततेने सुरू असलेल्या आंदोलनावर सरकारने लाठीचार्ज करण्याचा आदेश देऊन दडपशाहीचा प्रत्यय दिला आहे . सरकारचे हे कृत्य ब्रिटिश राजवटीलाही लाजविणारे असून, या अशोभनीय कृत्याचा आज आपण सर्व जाती धर्माचे बांधव एकत्र येऊन शांततेच्या मार्गाने निषेध व्यक्त करीत आहोत . . ! याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे . **अमित पाटील खडसे, ( जि . प .सदस्य वाशिम )**

## माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** वार्ड क्रमांक 15 येथील अनेक दिवसापासून यशवंत नगर राजीव गांधी नगर स्थानिक लोकांची माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाट यांच्याकडे मागणी होती की, त्यांच्या वस्तीत कॉंक्रिटीकरण रस्ता व्हावा यासाठी अण्णा भाऊ साठे नागरिक दलित वस्ती निधीतून काम व्हावे म्हणून भाजपचे अनुप अग्रवाल यांनी देखील यासाठी मदत केली असे माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांनी सांगितले या ठिकाणी माजी नगरसेवक यांनी सांगितले की या वार्डात कुठलेही काम असेल कधीही काही अडचण असेल तर मला संकोच पणे सांगा असे विचार करू नका की वार्डात जे नगरसेवक आहेत तेच काम करतील. एखाद्या व्यक्तीने ठरवलं की त्यांना स्थानिक नागरिकांचे काम करायचा आहे मग पद असो किंवा नसो तो काम करतोच फक्त माणसात जिद्द पाहिजे, असे या ठिकाणी माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांनी सांगितले. या ठिकाणी उपस्थित राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी नगर सेवक जितेंद्र शिरसाठ, धनराज शिरसाठ, सागर शिरसाठ, राज आगळे, यश बागुल, रितेश इंगळे, मोनू वाघ, विशाल सैंदाणे, रिंकू मगर व इतर नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.



# रावसाहेब दानवेंनी घेतली जखमींची भेट

## आंतरवाली सराटी प्रकरण; शांतता राखण्याचे केले आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** अंबड तालुक्यातील आंतरवाली सराटी येथे मराठा उपोषणकर्त्यांवर झालेल्या लाठीमारचे पडसाद जालन्यासह संपूर्ण महाराष्ट्रात उमटले. महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी अंतरवाली सराटीसह रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या जखमी आंदोलकांची भेट घेतली आहे. काल केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी अंबड येथील शासकीय रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली व प्रकृतीविषयी विचारपूस केली. आंदोलकांस सर्व प्रकारचे सहकार्य मिळेल असे आश्वासनही दिले. यावेळी त्यांच्या सोबत जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, आ.नारायण कुचे उपस्थित होते. पुढे बोलताना ना. रावसाहेब दानवे म्हणाले की अंतरवाली येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या समाजबांधवांवर झालेला लाठीमार



अत्यंत दुर्दैवी व दुःखद आहे.शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेशसही राज्य शासनाने दिले आहेत. दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल असेही ना.दानवें म्हणाले. आंदोलनाचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत असून काही भागात होणाऱ्या हिंसक घटना तातडीनं थांबण्याची गरज आहे.लोकशाहीच्या मार्गानं सुरु असलेलं आंदोलनाला कुठल्याही प्रकारे गालबोट लागू नये. त्यामुळे मी मराठा समाज बांधव, संघटनांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना  शांतता राखण्याचे आवाहन ना.दानवें यांनी केले. आम्ही आंदोलक व सर्व समाजबांधवांच्या पाठीशी आहोत. पूर्णपणे मराठा समाजाला सहकार्य मिळेल.राज्य सरकार मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सकारात्मक असून त्या दृष्टीने सरकार काम करत आहे, असे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी सांगितले.

# राज्यातील वीज ग्राहकांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यात सोमवारी (४ सप्टेंबर) दुपारी १२ वाजता विजेच्या मागणीत गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत घट झाली. त्यामुळे भारनियमन झाले नाही. राज्यात सोमवारी दुपारी १२ वाजता महावितरणची एकूण विजेची मागणी २३ हजार १५० मेगावॉट होती. त्यानुसार वीज उपलब्ध झाल्याने राज्यात कुठेही भारनियमन झाले नाही. त्यामुळे राज्यात गेल्या दोन दिवसांपासून कुठेही भारनियमन झाले नसल्याचा दावा महावितरणकडून करण्यात आला. राज्यात १ सप्टेंबरला सकाळी ६ वाजता महावितरणची विजेची मागणी २४ हजार ३०० मेगावॉट होती. तर मागणीच्या तुलनेत उपलब्ध विजेत ९०० मेगावॉटचा तुटवडा निर्माण झाल्याने सकाळी ६ ते ७.३० वाजेदरम्यान जी १ ते जी ३ गटातील फिडरवर आपत्कालीन भारनियमन केले गेले. तर २ सप्टेंबरला विजेची शिखर मागणी सकाळी ५.४० वाजता २३ हजार ७०० मेगावॉटवर खाली आली. त्यानंतरही मागणीच्या तुलनेत विजेच्या उपलब्धतेत १ हजार २०० मेगावॉटचा तुटवडा निर्माण झाल्याने राज्यात सकाळी ५.४० ते ७.१५ दरम्यान जी गटातील फिडरवर भारनियमन केले गेले. तर रविवारी आणि सोमवारी मात्र तुलनेत मागणीत किंचित घट झाली.



# लोणार शहरासह तालुका कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** अंतरवाली सराटी येथील मराठा समाजाच्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ शहरात आज, दि. ३ सप्टेंबर रोजी सकल मराठा समाज आणि विविध संघटनांच्या वतीने सरकारचा निषेध करून कडकडीत बंद पाळण्यात आला.

शनिवारी, दि. ३ सप्टेंबर रोजी सकल मराठा बांधव आणि विविध संघटनांच्या वतीने शहर बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देऊन शहरातील व्यापाऱ्यांनी आज सकाळपासूनच आपली दुकाने बंद ठेवली. त्यामुळे बाजारपेठेत शुकशुकाट होता. वैद्यकीय सेवा वगळता लोणार बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**सुलतानपूर येथे कळकळीत बंद ठेऊन रास्ता रोको आंदोलन**

जालना जिल्हा येथील मराठा आंदोलकावर झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ सुलतानपूर येथे कडकडीत बंद व मुंबई नागपूर हायवे वरती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले .यावेळी संपूर्ण सुलतानपूर वाशीयांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून निषेध व्यक्त करत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला .सकल मराठा समाज बांधव व गावकऱ्यांनी रस्ता रोका करत मुंबई नागपूर महामार्ग वर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात येथे रस्ता रोको करत निषेध व्यक्त करताना नागवंशी संघपाल पनाड, भानदास पवार, रमेश भानापुरे, पुरुषोत्तम पाटील, संतोष पाटील, डॉ . कडुकर, शेख अमीर भाई, जाकीर खा पठाण, संतोष शिंदे, गोपाल भानापुरे, वैभव टकले, अनंता टकले, शंकर निलक, अभिषेक कुटे, सुरेश आश्रू मोरे, मधुकर खेत्रे, सागर निर्मळे व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते . यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला .

# कन्नड येथे सकल मराठा समाज बांधवांचा हजारो संख्येने तहसील कार्यालयावर मोर्चा

## चिमुकल्या शिवकन्येचे तहसीलदार यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जिल्हातील आंतरवाली येथे पोलीसांनी मराठा बांधवावर अमानुष हल्ला केला सदरील पोलीसांना निलंबित करा असे निवेदन देऊ कन्नड येथील समाज बांधव येत्या दि.४ रोज सोमवारी पिशोर नाका येथून तहसील कार्यालयावर मोर्चा काढणार आहे. असे निवेदन उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, तहसीलदार विदयाचरण कडवकर, पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सुरेश चव्हाण, सुनील पवार, बाळू अल्लाड, विजय भोसले, गोरख पाटील, प्रवीण शिंदे, रामकृष्ण मराठे, संजय शिंदे, गोरख चव्हाण, महेश साळुंखे, संतोष पवार, प्रवीण जंजाळ, उदय गवळी इत्यादी मराठा समाज बांधवांची



उपस्थीती होती.

सोमवारी तालुक्यातील हाजारो मराठा बांधव यांनी एकत्र येऊन कन्नड शहरातील पिशोर नाका येथून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. एकदम शिस्तीत मोर्चा काढण्यात आला विशेष म्हणजे चिमुकल्या शिवकन्येकडून प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी मराठा समाज, राजकीय, सामाजिक, पोलीस, पत्रकार, वकील, व्यापारी समस्त सकल मराठा बांधवांची प्रमुख उपस्थिती होती.

# तोतया लष्करी अधिकाऱ्याला पुण्यात अटक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रेल्वे स्थानकात तोतया लष्करी अधिकाऱ्याला रेल्वे पोलिसांनी शुक्रवारी अटक केली आहे. दिल्लीतील स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याला २० वर्षीय तोतया अधिकाऱ्याने लष्कराचा बनावट गणवेश घालून हजेरी लावली होती. नीरज विश्वकर्मा, असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे.

नीरज विश्वकर्मा ( वय, २० ) हा उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहे. शनिवारी पुणे स्थानकात लष्करी गणवेशामध्ये नीरज विश्वकर्मा संशयास्पदरित्या फिरताना आढळला. चौकशी केल्यावर नीरज विश्वकर्माला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर तपासात धक्कादायक खुलासे झाले आहेत. १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावर स्वातंत्र्य दिन साजरा केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले होते. तेव्हा, विश्वकर्मा लष्करी अधिकाऱ्यासारखा लाल किल्ल्यावर गेला होता. त्याने काही छायाचित्रेही काढल्याचे समोर आले आहे. तसेच, त्याच्याकडून लष्कराचे बनावट कॅन्टीन कार्डही जप्त केले आहे.

संशियत आरोपीने १२ वी पर्यंत शिक्षण घेतले आहे. लष्करी अधिकारी म्हणून त्याने देशातील विविध ठिकाणी भेटी दिल्या आहेत, अशी माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.




# शेलुखडसे येथील अंगणवाडीत पोषण आहाराचे उद्घाटन; प्रभात फेरीने जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** महिला आणि बालकांचे पोषण व त्यांच्या आरोग्य स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने एक सप्टेंबर ते 30 सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रीय पोषण आहार महिना म्हणून दरवर्षी साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने शेलूखडसे येथील अंगणवाडी केंद्रात नुकतेच पोषण आहाराचे उद्घाटन करण्यात आले आहे. सदर योजनेची व्यापक प्रमाणात जनजागृती व्हावी, या उद्देशाने गावातून प्रभात फेरी सुद्धा काढण्यात आली आहे.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन गावातील उपसरपंच नारायण खडसे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. तर कार्यक्रमाच्या प्रस्ताविक अंगणवाडी सेविका सौ कविता खडसे यांनी केले. प्रास्ताविकातून माहिती विषद करताना, गर्भवती माता, स्तनदा माता व 0 ते सहा वर्षाचे बालके आणि किशोरी मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी या योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविल्या जात असल्याची माहिती दिली. त्यामध्ये प्रामुख्याने बालकांच्या आरोग्याची तपासणी अंगणवाडीमध्ये करून कमी वजनाच्या मुलांची तपासणी बालरोग तज्ञाकडून केली जाते. आणि विशेष करून आरोग्य स्वच्छतेबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती सुद्धा केली जाते. त्यामध्ये हात स्वच्छ धुऊन बालकांना पोषण आहार व औषधोपचार कसा द्यावा याबाबत संबंधित मातांना मार्गदर्शन करण्यात येते. शिवाय आरोग्यासाठी व्यायामाचे महत्त्व सुद्धा पटवून देण्यात येते. अशी विविध प्रकारची माहिती सौ कविता खडसे यांनी प्रस्ताविकामधून दिली. याप्रसंगी अंगणवाडी सेविका सौ निर्मला सावळे, मदतनीस स्वाती खडसे, अनिता खडसे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक गजानन खडसे, बद्री खडसे, किसन खडसे, नामदेव खडसे, परसराम खडसे, व मुक्ता खडसे आदींची उपस्थिती होती.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शासन आपल्या दारी नव्हे, दुष्काळ बळीराजाच्या घरी..!

## दुष्काळी परिस्थिती जबाबदारीने हाताळा : किसान काँगेसचे गौरीशंकर मुळे

आधुनिक केसरी न्यूज



**वसंत खडसे**

**वाशिम :** संपूर्ण राज्यासह, विदर्भ, मराठवाड्यातही जुलै महिन्यात बऱ्यापैकी पडणाऱ्या पावसाने ऑगस्ट महिन्यात चांगलीच दडी मारली आहे. परिणामी जमिनीतील ओलावा घटल्यामुळे बहरलेली उभी पिके करपून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. विदर्भ, मराठवाडा कोरड्या दुष्काळाच्या उंबरठ्यावर असून. बळीराजाला दुष्काळ जाहीर करण्याची अपेक्षा लागली आहे. सप्टेंबर महिन्यात सुद्धा फारसा पावसाची शक्यता नसल्याचे अंदाज वर्तवले जात आहेत. अशीच परिस्थिती आणखी काही दिवस कायम राहिल्यास शेतकऱ्यांना मोठ्या भीषण दुष्काळाचा सामना करावा लागणार आहे. शेतकऱ्यांच्या अर्थचक्राचा मुख्य आधारस्तंभ असलेला खरीप हंगामच हातातून गेल्यामुळे बळीराजाचे संपूर्ण आर्थिक बजेट कोलमडणार आहे. कर्ज काढून लागवडीवर खर्च करणाऱ्या शेतकऱ्यांना दुहेरी आर्थिक फटका खरीप हंगामात सोसावा लागणार आहे. त्यामुळे बँक, पतपेढ्या व खाजगी सावकारांच्या कर्जाचा डोंगर शेतकऱ्यांच्या छाताडावर उभा राहणार आहे. परिणामी कर्जबाजारीपणाच्या नैराशातून पुन्हा एकदा, शेतकरी आत्महत्येची मालिका सुरू होण्याची भीती नाकारता येत नाही. त्यासाठी केवळ "शासन आपल्या दारी " म्हणून भागणार नाही..! तर ' दुष्काळ बळीराजाच्या घरी ' आल्यामुळे सरकारने विदर्भ, मराठवाड्यातील दुष्काळस्थिती जबाबदारीने हाताळावी व शेतकऱ्यांना वाचवावे..! अशी मागणी किसान काँग्रेसचे प्रदेशउपाध्यक्ष गौरीशंकर मुळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे. दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात गौरीशंकर मुळे यांनी स्पष्ट केले आहे की, यंदाच्या पावसाळा ऋतूतील हा अखेरचा महिना सुरू आहे. आजपर्यंत पडलेल्या पावसाची सरासरी बघितल्यास अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडला असल्याचे स्पष्ट होते. मागील वर्षी अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेले नुकसान यंदा खरीप हंगामात भरून निघेल अशी आशा शेतकऱ्यांना होती, आणि उशिरा का होईना पण प्रारंभी झालेल्या दमदार पावसाने शेतकऱ्यांच्या अपेक्षा सुद्धा पल्लवीत झाल्या होत्या. याच बळावर मिळेल त्या मार्गाने कर्ज काढून महागडी रासायनिक खते, बी-बियाणे विकत घेत पेरण्याही उरकल्या, अधून मधून कुठे मध्यम स्वरूपाचा तर कुठे हलक्या सरीच्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे अख्खा शेतशिवार बहरून गेला होता. मात्र ऐन माल धरण्याच्या मौसमातच निसर्गाने दगा दिला. पावसाने चांगलीच दडी धरली आणि पाहता, पाहता होत्याचे नव्हतं झाले..! बहरलेले उभे पिके करपून जात आहेत. हिरवेगार दिसत असलेले शेतशिवार भकास दिसत आहेत. भयावह दुष्काळी स्थितीत शेतकऱ्यांसमोर अनेक समस्यांचा पहाड उभा ठाकला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने घेतलेल्या कर्जाची परतफेड, गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न, वीज आणि पाणी, मुलांचा शैक्षणिक खर्च व सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे परतीच्या पावसाने साथ दिली तर, रब्बीच्या हंगामातील पेरणीचा खर्च कसा करायचा..? असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांना



भेडसावत आहेत. त्यामुळे पुढे होऊ घातलेल्या महायुतीच्या मराठवाडा कॅबिनेट बैठकीकडे शेतकऱ्यांचे विशेष लक्ष लागेल आहे. सदर बैठकीत सरसकट कर्जमाफी, सरसकट पिक विमा, खाजगी सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्ती, बेरोजगारीवर तगडी उपायोजना, आणि सर्वात विशेष बाब म्हणजे पुढील हंगामासाठी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात अतिरिक्त वाढीव मदत म्हणून आर्थिक रक्कम जमा करण्यात यावी. आदी वास्तववादी मागण्या किसान काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गौरीशंकर मुळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केल्या आहेत.



# मराठा आंदोलनावर झालेल्या लाठीचार्ज निषेधार्थ बाजार सावंगी येथे कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जालन्यातील गेवराई येथे अंतरवाली सराटी येथील मराठा आंदोलन कार्यकर्त्यांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आला. या लाठी चार्जमध्ये अनेक मराठा आंदोलन करते गंभीर जखमी झाले आहे. यामध्ये महिलांच्या डोक्याला जबर फटक्यामुळे महिला रक्तबंबाळ झाल्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवर वायरल होत आहे.

यामुळे मराठा समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महाराष्ट्रभरातून ठिकठिकाणी निषेध नोंदविण्यात येतआहे. याच पार्श्वभूमीवर 03 सप्टेंबर रोजी लोकशाही मार्गाने बाजार सावंगी येथील सकल मराठा समाजाकडून जाहीर निषेध व्यक्त करत बंद पाळण्यात आला. या बंदमध्ये सर्व दुकाने हॉटेल व शॉप बंद होते. रस्त्यावर शुकशुकाट बघायला मिळाला.

# वाचनालयातील सुविधांकडे वरिष्ठांचा कानाडोळा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरी आणि ग्रामीण भागातील वाचकाची भुक भागावी म्हणून शासनाने वाचनलायाची स्थापणा केली आहे. तालूक्यातील काही वाचनालय सोडले तर बहूतांश ठिकाणी अनेक सुविधाचा अभाव असुन बंद अवस्थेत असल्याने वाचकांचा हिरमोड होत आहे. यावर त्वरीत कार्यवाही करून होणारी गैरसोय दूर करावी अशी वाचकांची मागणी आहे.
शिक्षणाने माणसाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून सर्वत्र शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यातून वाचनाची आवड निर्माण झाली असल्याने वाचकाना शिक्षणा सोबतच जगातील इतर आवश्यक असलेली माहिती मिळावी म्हणून शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून शहरी आणि ग्रामीण भागात वाचनालयाची स्थापना केली आहे.
तालूक्यात प्रारंभी मोजकेच वाचनालय होते आता वाचनालयाची संख्या वाढली आहे.संबधीत वाचनालय चालकास नियमितपणे अनूदान दिले जाते यातून त्यांनी वाचकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. याकडे कानाडोळा



करून काही भागातील वाचनालय केवळ अनूदान लाटण्याच्या हेतूने नाममात्र चालविले जात आहेत. यात प्रामुख्याने हाडोळी, पांडूर्णा, पाकीतांडा, सावरगावमेट, पोमनाळा, रावणगाव येथील वाचनालयात बैठक व्यवस्था नाही, पुस्तकाची वाणवा असून मनमानी कारभार सुरू असल्याने केवळ अनूदानापूरते ऊरले आहेत. कागदावर वाचनालय सुरू असले तरी प्रत्यक्षात मात्र वेगळी परिस्थिती आहे. सदरील वाचनालयाला कुणाच अभय मिळते आहे हे पाहण गरजेचे आहे. वरिष्ठांनी अशा वाचनालयाची कसून चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी वाचकाची मागणी जोर धरते आहे.








# कराचीवाला खुंट येथे युवासेनेचे निषेध आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मराठा समाजाच्या आंदोलक नागरिकांवर पोलिसांच्या माध्यमातून गोळीबार तसेच निर्घृणपणे लाठीचार्ज करवून घेणाऱ्या ह्या भ्याड हल्ला केला असा आरोप करीत युवा सेने तर्फे गोपाल टी जवळ आंदोलन करण्यात आले.
या आंदोलनात असंख्य शिवसैनिक उपस्थित होते. या आंदोलनात एका बॅनर मध्ये टरबूज चे चित्रीकरण करून त्या बॅनरला जोडे मारण्यात आले व रस्त्यावर टरबूज फोडून राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्याविरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात शिंदे सरकार व देवेंद्र फडणवीस यांचा मोठ्या प्रमाणावर निषेध करण्यात आला. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस तैनात होता. आझाद नगर पोलिसांनी आंदोलन कर्त्यांना ताब्यात घेण्यात आले व शहरात कुठल्याही प्रकारे वातावरण दूषित होऊ नये म्हणून तात्काळ आंदोलन कर्त्यांना पोलिसांच्या मोठ्या गाडीत नेले. या ठिकाणी युवा सेनेचे हरीश माळी यांनी सांगितले की कोणी संविधानिक मार्गाने आंदोलन करत असेल तर त्याचा आवाज दाबण्यासाठी जर केंद्रातील सरकार राज्यातील सरकार आपल्यासाठी अशा पद्धतीचा ताकदीचा वापर करून मराठा समाजाला दाबण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याचा आज आम्ही शिवसेना व युवा सेनाच्या माध्यमातून जाहीर निषेध करतो यापुढे कधी असा प्रकार घडला तर आम्ही पुन्हा मुंबई नॅशनल हायवे मार्ग जाम करणार आहोत त्या ठिकाणी जीवितहानी झाली तर त्या सर्व जबाबदार प्रशासन राहील आणि केंद्र सरकार आणि राज्य सरकार राहील असे या ठिकाणी युवा सेने तर्फे सांगण्यात आले.

सदर आंदोलना प्रसंगी नंदुरबार संपर्क प्रमुख प्रा शरद पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हा प्रमुख किरण जोंधळे,महानगर प्रमुख धीरज पाटील, ललित माळी, भरत मोरे, कैलास पाटील,संदीप सूर्यवंशी, दिनेश पाटील, कैलास मराठे,छोटू माळी, ॲड. विवेक सूर्यवंशी, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख हरीश माळी, उपजिल्हा प्रमुख कुणाल काणकाटे, युवासेना महानगर सिद्धार्थ करनकाळ, मनोज जाधव, विधानसभा प्रमुख योगेश मराठे, विधानसभा संघटक जीत पाटील, तालुका प्रमुख गणेश चौधरी, मंजू पाटील, स्वप्नील सोनवणे, निलेश चौधरी, रोहित अमृतकर, वैभव चव्हाण, जयेश फुलपगारे,समर्थ मुर्तडक, दादू मराठे, पूर्वेश चव्हाण, प्रीतम लोखंडे, उज्वल कोठावडे, सोनू काणकाटे,तुषार सातपुते, सोमेश काणकाटे, हर्षल फुलपगारे आदी शिवसैनिक-युवासैनिक उपस्थित उपस्थित होते.

## मराठा समाजाच्या वतीने बिडकिनला कडकडीत बंद; रास्तारोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** रविवारी पैठण तालुक्यातील बिडकिन येथे जालना जिल्ह्यात घडलेल्या निषेधार्थ घटनेच्या विरोधात मराठा समाजाच्या वतीने कडकडीत बंद करत रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. यावेळी बिडकिन व परिसरातील सर्वच छोट्या व मोठ्या बाजारपेठा बंद करण्यात आला होता. यावेळी मनोज पाटील मुरदारे छावा जिल्हाध्यक्ष, संतोष पाटील कुसेकर, किरण काळे, आप्पासाहेब जाधव, धनंजय चिरेकर, अनिल कुटे, नारायण नरवडे, विलास औटी, पिनू मुरदारे, तालुकाप्रमुख मनोज पेरे, जिल्हा उपाध्यक्ष काकासाहेब टेके, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण,सरपंच अशोक धर्मे, ग्रामपंचायत सदस्य विकास गोर्डे, रमेश शिंदे, अंकुश काळे, सागर फरताळे, अशोक टेके, रुपेश शिंदे, प्रविण चव्हाण आदींसह कडकडीत बंद पाळत व निषेध नोंदवण्याकरिता सर्व व्यापारी वर्ग, ग्रामस्थ, पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती.यावेळी सकल मराठा समाज - मराठा क्रांती ठोक मोर्चा बिडकीन सर्कल यांच्या वतीने सर्व उपस्थितांचे आभार मानले.



## टीसीएस परीक्षा सेंटरची मान्यता रद्द करा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि.१७ रोजी पासून महाराष्ट्र राज्यामध्ये तलाठी भरती परिक्षा सुरु झाली. त्या दिवसापासून परिक्षामध्ये रोज नवीन घोटाळे समोर येत आहे. पेपर फुटणे, ऐनवेळी परिक्षा केंद्राची अदलाबदल होणे, कुठे सॉप्टवेअर हँग होणे असे एक ना अनेक प्रकार घडत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होत आहे. तपासणीच्या नावाखाली वेगवेगळ्या प्रकारचे छळ होत असल्याचा आरोप मनीष नरवडे यांनी केला आहे, परिक्षा केंद्रावर महिलांचा अपमान होत आहे. परिक्षा केंद्रावर एक ना एक वस्तु जमा करुन घेतली जात आहे, त्यात महिलांचे सौभाग्यचे लेणं असलेले मंगळसुत्र, दागदागिने सुध्दा काढून ठेवण्यास सांगत आहे. म्हणजे महिलेला परिक्षा केंद्रावर



एक प्रकारे विधवा केल्यासारखीच वागणूक दिल्या जात असल्याने महिलांना मानसिक मनस्थाप सहन करावा लागत आहे, त्याचप्रमाणे बॅग, मोबाईल, अंगातील बनियन, बेल्ट, इत्यादी बाजूला काढायला लावून ते ठेवण्यासाठी अव्वाच्या सव्वा रक्कम आकारुन बेरोजगार तरुणांची लूट केली जात आहे. परिक्षा केंद्रावर साहित्य, वस्तू ठेवण्यासाठी जागा नसेल किंवा पार्किंगची व्यवस्था नसेल अशा परिक्षा केंद्रावर कुठलीच परिक्षा घेण्याचे अधिकार देण्यात येवू नये. तसेच अशा परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करावी. यापुढे ज्या सेंटरवर परीक्षा घेतली जाते, तेथे वाहनतळ मोफत उपलब्ध करुन द्यावे, तलाठी पदाच्या परीक्षा सुरु झाल्यापासून वारंवार गोंधळ निर्माण करुन बेरोजगार तरुण-तरुणींना छळणाऱ्या टीसीएस कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात यावा व परिक्षेचे योग्य ते नियोजन करुन परिक्षा नव्याने व पारदर्शक पध्दतीने घेण्यात यावी, अशी आग्रही मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत विभागीय आयुक्त सचिवालय कक्ष यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी योगेश उबाळे आकाश साबळे उपस्थित होते



## निफाड तालुक्यात मराठा समाजाच्या वतीने कडकडीत बंद; भव्य रॅलीचे आयोजन

### मंत्री छगन भुजबळ यांच्या विरोधात आक्षेपार्ह घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली (सराटी) येथे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी अत्यंत सनदशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीमार करत अत्यंत अमानुषपणे मारहाण केली. या घटनेचा निषेध म्हणून निफाड तालुक्यातील गावांनी सोमवार दि.४ रोजी कडकडीत बंद ठेवला. त्यानंतर मोटारसायकल व पायी रॅली काढत पोलीस उपनिरीक्षक राहुल वाघ यांना निवेदन देण्यात आले.

आज सकाळी विंचुर येथे हजारोंच्या संख्येने जमाव जमला होता. तेथून भगवे व निळे झेंडे घेऊन घोषणा देत मोटारसायकल रॅली व त्यानंतर भगरीबाबा मंदिरापासून पोलीस स्टेशनपर्यंत पायी रॅली काढण्यात आली.
या रॅलीत सर्व समाजाचे अबालवृद्ध सामील झाले होते. रॅलीत 'एक मराठा लाख मराठा', 'छ.संभाजी महाराज की जय', 'जय भवानी जय शिवराय', 'राजमाता जिजाऊ यांचा विजय असो' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. लासलगाव पोलीस स्टेशनसमोर जमाव एकत्रित झाला. याप्रसंगी दलित, मुस्लिम, जैन, वंजारी समाजाने आंदोलनास पाठिंबा देत असल्याची घोषणा व पत्र दिले. डॉ.श्रीकांत आवारे, डॉ.सुजित गुंजाळ, ललित दरेकर, वकील उत्तम कदम यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. प्रसाद फापाळे, केदारनाथ फापाळे, डॉ.श्रीकांत आवारे, उत्तम कदम यांनी मराठा समाजातील युवकांच्या व्यथा आपल्या भाषणातून मांडल्या. त्यानंतर समस्त महीलांच्या वतीने स.पो.नि राहुल वाघ यांना निवेदन देण्यात आले.

अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री मा.छगन भुजबळ यांचे स्वीय सहाय्यक बाळासाहेब लोखंडे यांनी आंदोलकांना संबोधित करतांना भुजबळ यांचा 'ओबीसी नेते' असा उल्लेख करत भुजबळांचा मराठा आरक्षणाला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. मात्र याच वेळी संतप्त युवकांनी गोंधळ करीत भुजबळ यांच्याविषयी आक्षेपार्ह घोषणाबाजी सुरु केल्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण तयार झाले होते. त्यामुळे स्वीय सहाय्यकांनी भाषण आवरते घेत निघून जाणे पसंत केले. पोलिसांनी बाळासाहेब लोखंडे यांना पोलीस स्टेशनमध्ये थांबण्याची विनंती केली. लोखंडे आंदोलनस्थळावरून जाते वेळीही आंदोलकांनी भुजबळ यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

विंचुर येथून बहुसंख्येने मराठा बांधव लासलगावकडे जाणार असल्याने विंचूर येथील मुस्लिम बांधवांनी महामार्गालगत सरबत आणि पाण्याची व्यवस्था केली होती . गोसे आजम ग्रुपच्या वतीने फिरोज मोमीन, इमरान मोमीन, हसन मोमीन, इमरान कादरी, करीम तांबोळी, बबलू मंसूरी, इक्बाल शाह, अजीम शाह, इलियास पठाण, हुसेन मोमीन, रशीद पठाण, अशपाक बेग, मोबीन मोमीन, राजू शहा, वसीम बेग, अब्दुल शहा भैया व मुस्लिम बांधव यांनी ही व्यवस्था केली होती .



# जालना येथील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ उमरी तालुका बंद

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** जालना येथे मराठा समाजाच्या - आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ आज सोमवार दि. 4 रोजी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने नांदेड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती, या आवाहनास उस्फुर्त प्रतिसाद देत उमरी तालुक्यातील सर्व व्यापारी, व्यवसायिकांनी स्वयंस्पुर्तीने आपली दुकाने बंद ठेवली. यावेळी पोलिसांचा मोठा चोख बंदोबस्तही ठेवण्यात आला होता.

जालना येथील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ उमरी तालुका बंदची हाक देण्यात आली होती, त्यानुसार सकाळी 11वाजता नगर परिषद,मोठा मैदान समोर सकल मराठा समाज बांधवांनी एकत्रित येऊन मराठा - समाजाच्या आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा तिव्र शब्दात निषेध व्यक्त केला. नांदेड जिल्हा बंदची हाक मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने दिली असताना जालना येथील अंतरवाली सराटी गावातील आंदोलनात लाठीचार्ज व गोळीबार प्रकरणी महाराष्ट्रभर आंदोलन मोर्चे सुरू आहेत. या लाठीमार प्रकरणाची चौकशी होऊन सर्व दोषींना तात्काळ निलंबित करावे त्याचबरोबर मराठा समाजाच्या आरक्षण विषयक मागण्या या तात्काळ मान्य कराव्यात यासाठी संचालक कैलासभाऊ देशमुख गोरठेकर आपले मनोगत व्यक्त केले. यादरम्यान येणाऱ्या काळामध्ये सुप्रीम कोर्ट असेल किंवा प्रशासकीय, मंत्रालय पातळीवर असेल मराठा समाजाच्या मागण्या तात्काळ मान्य करून न घेतल्यास हा उद्रेक मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचा निर्धार सर्व समाजबांधवांनी व्यक्त केला. सोबत कोणतेही आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केल्यास जशास तसे उत्तर देण्याची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी जिल्हाउपाध्यक्ष माधवराव



ताटेसह आदींनी आपले मनोगते व्यक्त केली, यावेळी,कैलासभाऊ देशमुख गोरठेकर,पांडुरंग देशमुख गोरठेकर माधवराव ताटे,छोटा छावा बालाजी पाटील,बालाजी जाधव,दासा पाटील शिरूरकर,अनिल नगनुरवार,कैलास पाटील इज्जतगावकर,नागेश पांढरे,अमोल पाटील कदम,संदेश गायकवाड,संतोष वाघमारे,हणमंत बेद्रे, योगेश मोरे,अविनाश पवळे, यांच्यासह तालुक्यातील मराठा बांधव उपस्थित होते. एक मराठा लाख मराठा अशा घोषणाही यावेळी देण्यात आल्या होत्या पोलिस निरिक्षक विश्वनाथ झुंजारे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता.






# अंतरवाली सराटीप्रकरणी श्रीरामनगरात निषेध सभा

## सामाजिक कार्यकर्ते सुभाष पाटील पांडभरे यांच्या पुढाकाराने बंद यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** बंदमध्ये सहभागी होऊन समाजाच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी श्री राम नगर विठ्ठलनगर, प्रकाशनगर संघर्ष नगर म्हाडा कॉलनी मूर्तिजापूर येथील काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी कम्युनिस्ट पक्ष, भीमशक्ती सामजिक संघटना व सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने परिसरातील व्यापारी वर्गाला बंदमध्ये सहभागी करून बंद हा 100/%  यशस्वी करून राज्य सरकारच्या आदेशाने शांततेने आंदोलन करणाऱ्या अंतरवाली सराटीतील महिला पुरुष व वृद्ध केलेल्या लाठी हल्ल्याच्या विरोधात निषेध सभा घेण्यात आली. यावेळी गंगाराम कापसे, माजीनगर सेवक गौतम लांडगे, सुभाष पाटील पांडभरे, विष्णू गुंठाळ, वल्लभ भंडारी, सुभाष शुक्ला, संदीपान काळे, सचिन वाघ, राहुल सावंत, भास्कर लहाने, पंडित आंबेकर, दशरथ मानवतकर, नाना जगताप, अनिल हरकळ, हिरालाल जयस्वाल, सुरेश हिवराळे, संतोष आगलावे, हेमंत नरवडे, तुकाराम साबळे, अक्रूर वाघ, सांडू मुरदारे पाटील, बेंद्रे आप्पा, दीपक मस्के, पांडुरंग साबळे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाठीहल्ला प्रकरणी खुलताबादेत उद्रेक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** अंतरवाली सराटी ( जि.जालना) येथे उपोषण करणाऱ्या मराठा आंदोलकांवर पोलीसांनी केलेल्या अमानुष लाठीहल्ला मारहण प्रकरण चिघळले असुण खुलताबाद तालुक्यात ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन, कडकडीत बंद, घोषणा व  राजीनाम्याची मागणी करत सकल मराठा समाज संताप व्यक्त करत रस्त्यावर उतरला आहे. सोमवारी बाजार सावंगी येथे सकल मराठा समाजाने गाव व मुख्य बाजार पेठ प्रतिष्ठाने कडकडीत बंद पाळत तीव्र निषेध केला. तर मेनमार्केट बस स्टॅंड छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ रस्ता रोको आंदोलन करत अनेक मान्यवर सरपंच आप्पाराव पाटील नलावडे, माजी सरपंच भिमराव पाटील नलावडे,युवराज नलावडे, पुंजाजी अण्णा नलावडे, विनोद साळुंकेसह मोठ्या संख्येने सकल मराठा समाज एकत्रीत येवून त्या घटनेचा निषेध करत सरकार जोपर्यंत आरक्षण देत नाही व चुक करणारे राजीनामा देत नाही तो पर्यंत निषेध, रस्ता रोको, उपोषण,आंदोलन सुरुच राहील असी ग्वाही दिली.आज बाजार सावंगीत सर्व समाजाने साथ व सहकार्य केल्या बद्दल सरपंच आप्पाराव पाटील नलावडे यांनी आभार मानले. यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मराठा आंदोलकावरील लाठीहल्ल्या विरोधात धर्माबाद कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्यावतीने सोमवारी  धर्माबाद बंदची हाक देण्यात आली होती.

या बंदला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद ठेवली. विशेषतः मुख्य बाजारपेठ, शाळा, महाविद्यालय, ट्युशन कडकडीत बंद ठेवल्याने हा बंद शंभर टक्के यशस्वी झाला आहे. शहरातील छत्रपती शिवाजी चौकात येथे मराठा समाजाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी, ग्रामीण भागातून आलेले मोठ्या संख्येने तरुण सकाळपासूनच चौकात जमू लागले होते. चौकात टायर जाळून



सरकारच्या विरोधातील आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या.

हे कार्यकर्ते एक मराठा लाख मराठा, जय भवानी - जय शिवाजी, राज्य सरकारचा करायचं काय खाली मुंडकं वर पाय, मराठ्यांना आरक्षण मिळाले पाहिजे, आरक्षण आमच्या हक्काचं नाही, कुणाच्या बापाचं, गृहमंत्री राजीनामा द्या, जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तुषार जोशी यांना बडतर्फ करा अशा घोषणानी शहर दुमदूमले होते. धर्माबाद शहरातील मुख्य बाजारपेठ बंद करण्यासाठी हजारोच्या संख्येने जमलेल्या समुदायाने मोंढा, पानसरे चौक,नरेंद्र चौक, नेहरू चौक, पोलीस स्टेशन, जुनी नगर पालिका, नटराज टॉकीज यारस्त्यावरील दुकाने बंद ठेवण्याची विनंती करण्यात आली. सकल मराठा समाजाने बंदचे आव्हान केल्यामुळे दुकाने उघडलीच नव्हती. ज्यांनी उघडली त्यानी तात्काळ बंद केली. छोटया मोठ्या व्यापाऱ्यांनी शंभर टक्के प्रतिसाद दिल्याने हा बंद यशस्वी झाला आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे व पोलीस अधिकारी मोठ्या संख्येने पोलिसासह उपस्थित आहेत.

# इस्लापूर बाजार समितीची अटी तटीची लढत; भाजपला बहुमत

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** एकमेकांच्या कट्टर विरोधात असणारे पक्ष इस्लापूर बाजार समिती तालुका किनवट च्या निवडणुकीत एकत्र आल्याचे पहावयास मिळाले, एकूण १८ जागेपैकी तीन उमेदवार हे बीजेपी चे बिनविरोध निवडून आले बाकी पंधरा जागेसाठी दोन नोव्हेंबर ला मतदान झाले व तीन नोव्हेंबरला मतमोजणी झाली. इस्लापूर बाजार समितीमध्ये बाकी पंधरा जागेसाठी निवडणूक झाल्या राष्ट्रवादी पक्ष हा काँग्रेस पक्षाची युती सोडून थेट बीजेपीमध्ये सामील झाला,मार्कस वादी कम्युनिस्ट पक्ष व काँग्रेस पक्ष वेगवेगळे लढल्यामुळे यांचा फायदा बीजेपीला झाल्याचे पहावयास मिळाले यामध्ये राष्ट्रवादीचे तीन उमेदवार निवडून आले तर काँग्रेसचा एक उमेदवार व शिवसेनेचा एक उमेदवार निवडून आला. राष्ट्रवादी बीजेपी यांचे बलाढ्य नेते रिंगणात उतरल्यामुळे तीन उमेदवार राष्ट्रवादीचे व १३ उमेदवार हे बीजेपी चे निवडून आले. एकंदरीत पहता बीजेपीला स्पष्ट बहुमत झाल्याचे दिसून येत आहे. बीजेपी राष्ट्रवादी शिवसेना व काँग्रेस पक्षाला मोठी टक्कर देत थोड्या मताने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पराभव झाला. असे मत कॉम्रेड अर्जुन आडे यांनी व्यक्त केले. तालुक्यात कोठेही सत्ता नसताना, मतदान करण्यासाठी येण्या जाण्याचा व कुठेही मतदाराला खर्च न करता चारही पक्षांना घाम फोडण्याचे काम माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या मतदारांनी केलं मी त्यांचे शतशः आभार व्यक्त करतो आणि त्याच ताकतीने पुन्हा गोरगरिबांच्या हक्कासाठी लढेल  असे मत निकाल लागून केवळ दोन मतानी हरल्यानंतर कॉम्रेड अर्जुन आडे यांनी जनतेसमोर आपले मत व्यक्त केले.